किंमत रु. ३०
पृष्ठे ४४

# जीवन शिक्षण

नोव्हेंबर २०२०




## तमसो मा ज्योतिर्गमय...

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

## नवआकांक्षांचे विचार घेऊनी एकमेकांना शुभेच्छा देऊनी
## चला साजरी करू निरोगी दीपावली.























# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६४ नोव्हेंबर २०२० अंक ८ वा

❖ **प्रवर्तक :**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**दिनकर पाटील**, *संचालक तथा संपादक* **अध्यक्ष**

**विकास गरड**, *प्र. प्राचार्य, आय.टी. व प्रसार माध्यम* **सदस्य**

**डॉ. कमलादेवी आवटे**, *प्राचार्य, समता विभाग* **सदस्य**

**डॉ. शोभा खंदारे**, *प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे.* **सदस्य**

**अश्विनी मुसळे-काळसर्पे** *सहा. संचालक, लेखा* **सदस्य**

**दत्तात्रय थिटे**, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* **सदस्य**
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

**वर्षाराणी भोपळे**, *वरिष्ठ अधिव्याख्याता* **सदस्य**
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

❖ **डॉ. किरण धांडे**, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* **सदस्य-सचिव**
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

❖ **निर्मिती सहायक :**
**अनुराधा चव्हाण**, *विषय सहायक, प्रसार माध्यम*
रा. शै. सं. व प्र. प., महाराष्ट्र, पुणे.

❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** -

❖ **मूल्य : रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-**

## अंतरंग

| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ शिक्षक : शिक्षणव्यवस्थेचा प्राणवायू | डॉ. विशाल तायडे | ५ |
| ❖ स्मरण... बालकप्रेमी पंतप्रधानांचे! | सरोजताई देशमुख | १० |
| ❖ स्वतंत्र भारताचा निर्माता... | संदीप वाकचौरे | १२ |
| ❖ हिंमत हारलो नाही! | इंद्रजित भालेराव | १५ |
| ❖ शिक्षकांपुढील आव्हाने! | डॉ. ह. ना. जगताप | १७ |
| ❖ शिक्षण आणि संस्कार | डॉ. रमाकांत कोलते | २० |
| ❖ वेध भविष्यातील शिक्षणाचा... | रेणू दांडेकर | २५ |
| ❖ 'चकली चुकली नि अनारसा रुसला तर फराळच फसला...' | आनंद घैसास | २९ |
| ❖ 'नव्या पिढीची नवी दृष्टी' | विश्वास सुतार | ३२ |
| ❖ नको फटाक्यांची वात... | भाऊसाहेब चासकर | ३५ |
| ❖ मा. सचिवांची बालकट्ट्याला शाबासकी | प्रवीण काळमपाटील | ३८ |
| ❖ दिवाळी | नंदा कुलकर्णी | ४१ |
| ❖ प्रिय संपादक | | ४२ |

**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....



**सर्व वाचकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!**

दीपावली म्हणजे दिव्यांचा सण. दीपज्योती केवळ अंधाराला नष्ट करीत नाहीत, तर मानवी जीवनातील अवघा आसमंत उजळून टाकतात. आपण या दीपावलीच्या निमित्ताने अंत:करणातील विकारांचा अंधकार नष्ट करू या. सद्विचारांच्या प्रकाशाने जीवनाची नवी वाट उजळून टाकू या. आपली वाट उजळत असताना इतरांच्या पाऊलवाटा देखील उजळायला हव्यात. त्या वाटा उजळण्यासाठी शिक्षणक्षेत्रातील आपण सर्वांनी निरक्षरतेचा अंधकार नष्ट करण्यासाठी अंत:करणातील निश्चयाची ज्योत प्रज्वलित करण्याचा संकल्प करू या. आपणच ज्ञानाच्या ज्योती बनू या. एका ज्योतीने दुसरी ज्योत प्रज्वलित करू या. शेवटी अंत:करणात पेटलेला दिवा दुसरा दिवा पेटवीत जातो आणि अशा पेटत्या दिव्यांच्या अंगी बाहेरचा अंधार भेदण्याची शक्ती असते. ही शक्तीच अखंड भारतातील निरक्षरतेचा अंधकार नष्ट करेल असा विश्वास वाटतो.

या महिन्यात १४ नोव्हेंबर हा भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन आहे. बालदिन म्हणून तो साजरा केला जातो. पंडित नेहरूंनी देशाच्या विकासाचे स्वप्न पाहिले. त्या विकासाच्या आखलेल्या पाऊलवाटांचा आज हमरस्ता झाला आहे.

बालदिन साजरा करीत असताना आपल्याला याकडे लक्ष दिले पाहिजे की, प्रत्येक मूल शाळेत येईल आणि ते शिकेल यासाठी आपण आनंददायी शिक्षणाची पाऊलवाट निर्माण करण्याची गरज आहे. अशीच शिक्षणाची पाऊलवाट स्वयंप्रेरणेने काम करणाऱ्या राज्यातील अनेक बालरक्षकांनी स्थलांतरित, ऊसतोड कामगारांच्या, पालावरच्या, झोपडपट्टी आणि वीटभट्टीवरच्या तसेच दिव्यांग मुलांसाठी निर्माण केली आहे. वर्तमानात कोरोनाचे संकट आहे, त्या पार्श्वभूमीवर शाळा बंद आहेत. या परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले आहे. अशा परिस्थितीत मुलांच्या शिक्षणाची वाट चुकणार नाही यादृष्टीने शिक्षक, शिक्षणप्रेमी आणि नागरिक म्हणून सर्वांनीच एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. प्रत्येक मुलाच्या घरी शिक्षणाची ज्योत पोहोचविणे म्हणजे ज्ञानाने त्यांच्या जीवनातील अज्ञान, दारिद्र्य व विषमतेचा अंधकार नष्ट करणे होय. त्यामुळे ही दीपावली या संकटाच्या पार्श्वभूमीवर अधिक जबाबदारीने साजरी करण्याची गरज आहे.

सध्याच्या परिस्थितीत फटाकेमुक्त दीपावली साजरी व्हावी यासाठी शिक्षकांनी सामाजिक जबाबदारी म्हणून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्याची गरज आहे. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास या निमित्ताने कमी करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. मानवी जीवनात अज्ञानाचा आणि निसर्गात असणारा प्रदूषणाचा अंधकार नष्ट करण्यासाठी सर्वजण कटिबद्ध होऊ या. आपल्या हाती असलेली ज्ञानाची पणती अनेकांच्या आयुष्यात प्रकाशाची दीपावली आणेल.

पुनश्च दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**दिनकर पाटील**
संपादक, जीवन शिक्षण

# शिक्षक : शिक्षणव्यवस्थेचा प्राणवायू

**डॉ. विशाल तायडे**
वरिष्ठ अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, औरंगाबाद.

**मुलाखत :** विशाल सोळंकी (भा.प्र.से.)
आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

'शैक्षणिक गुणवत्तावाढ' हेच एक महत्त्वाचे उद्दिष्ट आपल्या डोळ्यांसमोर ठेवून सातत्याने नवनवीन उपक्रम राबविण्यास उत्सुक असणारे राज्याचे शिक्षण आयुक्त म्हणून विशाल सोळंकी यांचे नाव घ्यावे लागेल. पुणे जिल्ह्यातील सासवड हे त्यांचे मूळ गाव. शालेय जीवनापासूनच त्यांनी प्रशासनात जाण्याचा निश्चय केला होता. या माध्यमातून समाजासाठी भरीव योगदान देता येते हे लक्षात आल्यावर त्यांनी अधिकारी बनण्याचा ध्यास घेतला.



ते २००५ च्या बॅचचे आय.ए.एस. अधिकारी आहेत. आसाम केडरमध्ये नियुक्ती झाल्यानंतर गेली तेरा-चौदा वर्षे त्यांनी तेथे विविध पदांवर काम केले. त्यात जिल्हाधिकारी, सहाव्या वित्त आयोगाचे सचिव, राज्याच्या मुख्य सचिवांचे स्टाफ अधिकारी तसेच मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून कार्य केल्यानंतर ते महाराष्ट्रात प्रतिनियुक्तीवर राज्याचे शिक्षण आयुक्त म्हणून रुजू झाले आहेत.

शिक्षण आयुक्त म्हणून काम करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीवर भर देताना शिक्षण विभागातील अधिकारी आणि शिक्षक यांचे विविध प्रश्न सोडविण्यास ही प्राधान्य दिले. शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षक भरतीमध्ये 'पवित्र पोर्टल'चा उपयोग करून पारदर्शकता आणणे, शिक्षकांचे प्रभावी प्रशिक्षण यांसारख्या अनेक उपक्रमांतून त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली आहे. या मुलाखतीच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राविषयी त्यांचे विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रश्न : तुम्ही अनेक वर्षे आसाममध्ये कार्य केले आहे. महाराष्ट्र आणि तेथील शिक्षण व्यवस्थेमध्ये आपणांस कोणते फरक जाणवले?**

**उत्तर :** महाराष्ट्रात तंत्रस्नेही शिक्षकांची मोहीम फार चांगली आहे. येथील शाळांमधील मूलभूत सुविधा आसामच्या तुलनेत उत्तम आहेत. येथील शिक्षक सतत वेगवेगळे प्रयोग करीत असतात. स्वयंसेवी संस्थांचा शिक्षण प्रक्रियेतील सहभाग महाराष्ट्रात फार चांगला असल्याचे दिसून येते. या गोष्टींची आसाममध्ये कमतरता जाणवली. तेथील चांगली बाब सांगायची म्हणजे आसाममध्ये, विशेषतः तेथील ग्रामीण भागामध्ये अनेक प्रयोगशील शिक्षक मला आढळले, जे मुलांचे शिक्षण चांगल्या प्रकारे व्हावे यासाठी धडपडत असतात. तसे प्रत्येक व्यवस्थेचे गुणदोष असतात, मात्र महाराष्ट्र निश्चित अनेक बाबतीत प्रगतीशील आहे असे म्हणावे लागेल.

**प्रश्न : शिक्षण आयुक्त म्हणून तुम्ही नवीन शैक्षणिक धोरणाकडे कसे पाहता?**

**उत्तर :** या धोरणामध्ये शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने विचार करता अनेक चांगल्या गोष्टींचा समावेश करण्यात

आलेला आहे. ज्या अनेक बाबींवर आपण बोलत होतो किंवा अनेक ठिकाणी ज्या बाबी शिक्षण प्रक्रियेत उपयोगातही आणल्या जात होत्या, त्या केंद्र सरकारने संपूर्ण देशासाठी आणल्या आहेत. मला वाटते की, आता खरे आव्हान या धोरणाची अंमलबजावणी करण्याचे आहे. मोठे आव्हान आर्थिक तरतुदीचे आहे. जीडीपीच्या सहा टक्के शिक्षणासाठी देण्याचे धोरण आहे. इतकी रक्कम दिली तरी त्याचा उपयोग खऱ्या अर्थाने मुलांची गुणवत्ता वाढविण्यासाठी होणे गरजेचे आहे. शाळांच्या प्रगतीसाठी यातील किती पैसा उपयोगात आणला जाणार आहे हेही मला महत्त्वाचे वाटते. धोरणात निश्चित केलेल्या कालावधीत त्या त्या बाबी पूर्ण करणे गरजेचे आहे व धोरणाची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यावरही या धोरणाचे यश अवलंबून असणार आहे.

**प्रश्न : राज्याचा शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी आपल्या काय योजना आहेत?**

**उत्तर :** मुलांच्या मूलभूत क्षमता चांगल्या रीतीने विकसित करणे अत्यंत गरजेचे आहे. फाऊंडेशन, लिटरसी आणि न्युमेरीकल (एफएलएन) मिशन हा आपल्या प्राधान्याचा विषय असला पाहिजे. असरच्या अहवालात महाराष्ट्राला वरच्या क्रमांकावर घेऊन जायला हवे. मूल्याधारित शिक्षण, अध्ययन निष्पत्ती, २१ व्या शतकातील कौशल्य, वैश्विक नागरिकत्व यांसारख्या मुद्द्यावर भर द्यावा लागणार आहे. मला हे सांगायला आनंद होतो की, आपल्या गेल्या काही वर्षातील प्रयत्नांमुळे Performance Grading Index (PGI) मध्ये महाराष्ट्र राज्य देशातील मोठ्या राज्यांमध्ये अव्वल स्थानावर आहे. यातही आपण आणखी काही प्रशासकीय सुधारणा करणे गरजेचे आहे, त्यामुळे आपण आणखी वरच्या क्रमांकावर जाऊ शकू. शाळाबाह्य मुले हाही मला एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा वाटतो. स्थलांतरित बालकांचा प्रश्नही सर्वांनी विशेष लक्ष घालून सोडवायला पाहिजे. ही बालके शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवणे आणि त्यानंतर त्यांच्या अध्ययन निष्पत्तीत वाढ होण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना शारीरिक, मानसिक आणि भावनिक दृष्ट्या सक्षम करण्यावर भर देणे आवश्यक आहे. याशिवाय शिक्षकांचे प्रशिक्षण हा मला एक महत्त्वाचा मुद्दा वाटतो. शिक्षकांना आपण जेवढे सक्षम बनवू, तेवढेच आपले विद्यार्थीही सक्षम बनतील. त्यामुळे निष्ठासारख्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपले हे प्रयत्न सतत चालू ठेवणे. तसेच प्रशासकीय यंत्रणेतील आणि शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत, ही पदे भरली जावीत यासाठी प्रयत्न करणे, निकषांनुसार योग्य प्रकारे पदोन्नती होणे या बाबींकडे लक्ष दिले पाहिजे. शिक्षकांना आणि यंत्रणेतील सर्व घटकांना त्यांच्या सेवा काळात कसलाही त्रास होऊ नये, जेणेकरून शिक्षण यंत्रणा प्रभावीपणे आपले काम करू शकेल. पवित्र पोर्टलच्या माध्यमातून आपण सहा हजारांहून अधिक उमेदवार अतिशय पारदर्शक पद्धतीने निवडून नियुक्त केले आहेत.

**प्रश्न : राज्याचे शिक्षण आयुक्त म्हणून विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक आणि सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणा यांच्याकडून आपल्या काय अपेक्षा आहेत?**

**उत्तर :** सध्याच्या काळामध्ये विद्यार्थी घरी आहेत. अशा परिस्थितीमध्ये आपले शारीरिक व मानसिक स्वास्थ व्यवस्थित राहील या दृष्टीने त्यांनी स्वतःला गुंतवून ठेवले पाहिजे. विविध विषयांतील मूलभूत क्षमता प्राप्त करण्यावर विद्यार्थ्यांचा भर असावा. त्याचप्रमाणे या काळात त्यांना भरपूर वेळ मिळत आहे. त्याचा उपयोग नवनवीन कौशल्ये शिकण्यासाठी करायला हवा. इतर वेळी त्यांना वेळेअभावी जे छंद जोपासता येत नाहीत, असे छंद त्यांनी जोपासावेत. गोष्टी लिहिणे, कविता करणे, नवीन खेळ शिकणे, आई-वडिलांना घरात

मदत करणे इत्यादी. घरात मदत केल्याने श्रमप्रतिष्ठा हे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित होऊ शकेल. शाळा सुरू झाल्यावर त्यांना वाटायला हवे की कोविडच्या काळामध्ये मी नवीन असे काहीतरी शिकलो जे मला आयुष्यभर उपयोगी पडेल.

या काळामध्ये शिक्षकांची जबाबदारीही फार महत्त्वाची आहे. त्यांनी आपली सामाजिक आणि नैतिक जबाबदारी ओळखून काम करायला हवे. अनेक शिक्षक आपल्यापरीने या काळात उत्तम काम करीत आहेत. मात्र असेही अनेक आहेत की, त्यांनी आपली जबाबदारी ओळखलेली नाही. त्यामुळे शिक्षकांनी स्वतः पुढाकार घेऊन मुलांचे शिक्षण सुरू रहावे यासाठी प्रयत्न करावेत कारण मुले शाळाबाह्य झाली, शिक्षणाच्या प्रवाहापासून तुटली आणि शाळांतील पटसंख्या कमी झाली तर अनेक समस्या निर्माण होतील. अतिरिक्त शिक्षक होणे किंवा समायोजन करणे अशा गोष्टी त्यातून होऊ शकतात म्हणून शिक्षकांनी आपली आणि आपल्या कुटुंबीयांच्या आरोग्याची काळजी घेऊन शाळेतील विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू रहावे यासाठी शक्य ते प्रयत्न करायला हवेत, अशी माझी अपेक्षा आहे.

मुख्याध्यापकांनी येत्या काळात शाळा सुरू होण्यापूर्वी योग्य ती वातावरण निर्मिती करणे गरजेचे आहे. पालकांचे उद्‌बोधन करून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी त्यांची मानसिक तयारी केली पाहिजे. त्याचप्रमाणे शाळेची स्वच्छता तसेच शाळेचा संपूर्ण परिसर सॅनिटाईज करून घ्यावा. शाळा व्यवस्थापन समितीची बैठक बोलावून त्यांनी शाळेच्या दृष्टीने चांगले निर्णय घेणे गरजेचे आहे. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यात एक विश्वासाचे वातावरण तयार करण्यात मुख्याध्यापकांची भूमिका महत्त्वाची आहे असे मला वाटते. त्यासाठी शाळेशी संबंधित असणाऱ्या विविध घटकांशी मुख्याध्यापकांनी समन्वय साधणे गरजेचे आहे.

सर्व पर्यवेक्षकीय यंत्रणा : केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच डायटचे प्राचार्य, अधिव्याख्याता, विषय सहायक, साधनव्यक्ती यांनीही शाळा व्यवस्थित सुरू व्हाव्यात यासाठी मुख्याध्यापक आणि शिक्षक यांना पूर्ण सहकार्य करायला हवे. या प्रत्येक घटकाने नेहमीच्या पद्धतीने काम करण्यापेक्षा मुलांचे शिक्षण व्यवस्थित सुरू रहावे यासाठी वेगळा विचार करून आपली भूमिका सक्षमपणे पार पाडणे गरजेचे आहे.

**प्रश्न : राज्यातील प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकी-करणापुढे कोणती आव्हाने आहेत असे आपल्याला वाटते?**

**उत्तर :** प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणापुढे जी मुख्य आव्हाने आहेत, त्यात शाळाबाह्य विद्यार्थी हे आपल्या सर्वांसाठी एक मोठे आव्हान आहे. ऊसतोडणी किंवा वीटभट्टी यांसारख्या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांचे शाळाबाह्य होण्याचे व स्थलांतरित होण्याचे प्रमाण अधिक आहे. या मुलांसाठी त्यांच्या राहण्याच्या ठिकाणीच शाळा सुरू कराव्या लागतील. नवीन शैक्षणिक धोरणामध्येही याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. जेणेकरून शाळेत जाण्याच्या वयाचे प्रत्येक मूल शाळेच्या प्रवाहात कसे येईल आणि टिकून राहील याचा विचार करावा लागणार आहे. त्याचप्रमाणे अगदी लहान बाबींसाठी विद्यार्थी शाळाबाह्य होताना दिसतात. शाळांत उत्तम भौतिक सुविधा असणे ही काळाची गरज आहे. चांगले स्वच्छतागृह नसल्यामुळे मुली शाळाबाह्य झालेल्या आपण पाहिले आहे. या सुविधा आपल्याला शाळेत उपलब्ध करून द्याव्या लागतील. साधारणतः समाजातील आर्थिक दुर्बल आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गातील मुले सरकारी शाळांत प्रवेशित होत असतात. त्यांच्यासाठी उत्तम शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे हे आपले कर्तव्य

आहे. सध्याच्या कोविडच्या काळामध्ये विद्यार्थ्यांच्या समस्यांमध्ये आणखी वाढ झालेली आहे. ऑनलाईन शिक्षण घेण्यात अनेक मुलांना अडचणी आहेत. या सगळ्याचा विचार आपल्याला शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करताना करावा लागणार आहे.

राज्यातील बालरक्षक चळवळ आणखी वाढली पाहिजे. अधिकाधिक शिक्षकांनी त्यात सहभाग घेतला पाहिजे. आपल्या गावातील प्रत्येक मूल हे शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची आपली जवाबदारी आहे या जाणीवेतून शिक्षकांनी काम करायला हवे असे मला वाटते. राज्यात सध्या पाच हजार बालरक्षक कार्यरत आहेत. ही बालरक्षकांची संख्या पन्नास हजारांपर्यंत जायला हवी.

**प्रश्न : सध्याच्या कोविड काळात ऑनलाईन शिक्षण अधिक प्रभावीपणे कसे द्यावे असे आपल्याला वाटते ?**

**उत्तर :** आपल्या शिक्षण विभागाचे त्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. मा. शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड, मा. अपर मुख्य सचिव वन्दना कृष्णा व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक दिनकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय उत्तम असे नियोजन करून आपण राज्यातील मुलांचे शिक्षण सुरू ठेवले आहे. मी परिषदेतील सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन करतो की, या लॉकडाऊनच्या काळात त्यांनी राज्यातील मुलांचे शिक्षण सुरू रहावे यासाठी फार स्तुत्य असे उपक्रम राबविले आहेत. 'शाळा बंद, शिक्षण सुरू' अशा दैनंदिन उपक्रमांच्या माध्यमातून सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. व्यावसायिक विकास मंचच्याद्वारे मुख्याध्यापक, शिक्षक आणि सर्व क्षेत्रीय यंत्रणेचा व्यावसायिक विकास होत रहावा यासाठी विविध माहितीपूर्ण सत्रे आयोजित केली. मोबाईल व लॅपटॉपच्या अभावी मोठ्या प्रमाणावर मुले शिक्षणापासून दूर जाऊ नयेत यासाठी दूरदर्शनवर 'टिली मिली' सारखा एक चांगला उपक्रम सुरू केला आहे.

तरीही शंभर टक्के मुलांपर्यत आपण अद्याप पोहोचू शकलेलो नाही, ही वस्तुस्थिती आहे. ही मुले उद्या शाळाबाह्य होणार नाहीत, याची आपल्याला काळजी घ्यावी लागणार आहे. आपल्या सर्वांची ही जबाबदारी आहे की, अध्ययन निष्पत्तीत अपेक्षेप्रमाणे त्यांची प्रगती झाली पाहिजे, तरच पुढच्या वर्गात ते सक्षमपणे प्रवेश करण्यास पात्र असतील.

**प्रश्न : विद्यार्थी गुणवत्ता आणि शिक्षक प्रशिक्षण यांचा कसा संबंध आहे असे आपल्याला वाटते ?**

**उत्तर :** हो, दोन्ही बाबींचा मोठा परस्पर संबंध आहे. शिक्षक हे आपल्या शिक्षण व्यवस्थेचे प्राणवायू आहेत असे मी मानतो. शिक्षक जर सक्षम नसेल तर शिक्षण व्यवस्थाही सक्षम होणार नाही. त्यामुळे शिक्षकांना सक्षम करण्यासाठी आपल्याला सातत्याने प्रयत्नरत रहावे लागेल. शिक्षकांच्या गरजेप्रमाणे त्यांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करायला हवे कारण प्रत्येक शिक्षकाच्या प्रशिक्षण गरजा वेगळ्या असतात. त्या विचारात घेऊन आपण त्यांना प्रशिक्षण द्यायला हवे. त्याचा विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकेल. तसेच शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे मूल्यमापन योग्य रीतीने होण्यासाठी मूल्यमापन प्रक्रियेत शिक्षकांना नवीन पद्धती आणि नवीन तंत्रज्ञान यांचा उपयोग करण्यास प्रोत्साहन द्यायला हवे.

**प्रश्न : राज्यातील क्षेत्रीय अधिकारी कार्यालये अधिक सक्षम होण्यासाठी नेमके काय करणे आवश्यक आहे ?**

**उत्तर :** राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना तंत्रज्ञानाचे पुरेसे ज्ञान असणे ही काळाची गरज आहे. कार्यालयामध्ये तंत्रज्ञानाचा वापर दैनंदिन कामकाजात वाढवायचा असेल तर त्या कार्यालयातील प्रमुख अधिकाऱ्याने आधी स्वतः असा वापर करायला शिकले पाहिजे. तरच

कार्यालयातील इतरांना तशी प्रेरणा मिळू शकेल व त्या कार्यालयातील कामकाज अधिक सुकर होण्यास मदत होईल. त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांचा कायद्याचा चांगला अभ्यास असला पाहिजे. न्यायालयीन निर्णय, विविध शासन निर्णय यांचे वाचन करून त्यांनी ते स्वतः समजून घेतले पाहिजेत. जेणेकरून त्यांना आपल्या कामकाजात त्याचा उपयोग होऊ शकेल. अधिकाऱ्यांना व्यावसायिक विकासाच्या प्रशिक्षणाच्या संधी निश्चित कालावधीनंतर मिळायला हव्यात, ज्यामुळे नवीन विषयांची, कामकाज पद्धतीची त्यांना माहिती मिळू शकेल.

क्षेत्रीय कार्यालये अधिक सक्षम होण्यासाठी तिथे पुरेशा भौतिक सुविधा उपलब्ध असणे मला आवश्यक वाटते. त्याचप्रमाणे या कार्यालयांतील चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा योग्य तो सन्मान होणे आणि आपल्या कामात कुचराई करणाऱ्यांना समज देणे व त्यांच्यावर योग्य ती कारवाई करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपल्या विभागाची प्रतिमा जनमानसामध्ये चांगली होऊ शकेल.

**प्रश्न : आपण महाराष्ट्रातील शिक्षणाच्या गुणवत्ता वाढीसाठी अधिकारी आणि शिक्षकांना काय संदेश द्याल?**

**उत्तर :** मी या मुलाखतीच्या माध्यमातून आपल्या सर्वांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्राला फार गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. गेल्या दीडशे–दोनशे वर्षांत अनेक समाजसुधारकांनी महाराष्ट्रातील शिक्षणाची स्थिती सुधारण्यासाठी अपार कष्ट केलेले आहेत. छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वि. रा. शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासारख्या समाजसुधारकांनी हा पुरोगामी महाराष्ट्र घडविला आहे.

देशभरामध्ये आपल्या राज्यातील शिक्षण व्यवस्थेकडे एक चांगले उदाहरण म्हणून पाहिले जाते. राज्यातील सर्व अधिकारी आणि शिक्षकांनी हे नेहमी लक्षात ठेवले पाहिजे की, पुढच्या पंचवीस वर्षांनंतर या देशाचे नेतृत्व करणारी पिढी आज आपण घडवीत आहोत. त्यामुळे आपल्यावर फार मोठे सामाजिक दायित्व आहे, याची जाणीव ठेवून जर आपण काम केले तर प्रत्येक शिक्षक शेकडो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात फार चांगला बदल घडवून आणू शकतो आणि त्यांच्या जीवनाला योग्य ते वळण देऊ शकतो. त्यामुळे भविष्यातील समाज तयार करण्यामध्ये शिक्षकाची फार महत्त्वाची भूमिका असणार आहे. याची जाणीव शिक्षकांसोबतच यंत्रणेतील प्रत्येक घटकाच्या मनात असली पाहिजे.

आपल्या सर्वांच्या प्रयत्नांमुळेच आपण महाराष्ट्राला देशात शैक्षणिक दृष्ट्या अव्वल क्रमांकावर ठेवू शकणार आहोत. त्यासाठी काळाची पावले ओळखून आपण सर्वांनी अधिक नियोजनबद्ध आणि प्रभावीपणे काम करायला हवे.

या ठिकाणी मी Forest Witcraft यांचे 'Within My Power' मधील एक वाक्य सांगू इच्छितो की – "One hundred years from now it will not matter what kind of car I drove, what kind of house I lived in, how my money was in my bank account, nor what my clothes looked like, but the world may be a better place because I was important in the life of a child."

शेवटी आपणा सर्वांना दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

# स्मरण...
# बालकप्रेमी पंतप्रधानांचे!

**सरोजताई देशमुख**
निवृत्त प्राध्यापिका, वर्धा
भ्रमणध्वनी : ९८२२८१३९५०

*देखणे व्यक्तिमत्त्व, उच्च शिक्षण, वैज्ञानिक दृष्टी आणि औद्योगीकीकरणाला प्राधान्य देण्याचा दूरगामी विचार डोळ्यांपुढे ठेवणारे, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू. पंडित नेहरूंना लहान मुले फार प्रिय. त्याचा प्रत्यय आलेल्या एका आठवणीविषयी...*

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी आपला देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंतप्रधानपदी पंडित जवाहरलाल नेहरू विराजमान झाले. भारतासारख्या विशाल, खंडप्राय देशाची जबाबदारी त्यांच्यावर पडली.

त्यांचे देखणे व्यक्तिमत्त्व, संपन्न कौटुंबिक पार्श्वभूमी, परदेशी जाऊन घेतलेले उच्च शिक्षण, उत्तम अभिरुची, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या मदतीने आधुनिक भारताची उभारणी करण्याची भूमिका, औद्योगिकीकरणाला प्राधान्य देण्याचा आग्रह यामुळे तेव्हाची तरुण पिढी या उत्साहाने सळसळणाऱ्या पंतप्रधानांकडे आकृष्ट झाली आणि तिने राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात मनापासून भाग घेतला.

दीडशे वर्षांच्या प्रदीर्घ पारतंत्र्याच्या काळात इंग्रज राज्यकर्त्यांनी भारताची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्वच बाजूंनी अक्षरशः लूट आणि पिळवणूक केली होती. असंख्य उणिवा, अडचणी, आपत्ती देशापुढे आ वासून उभ्या होत्या. त्यांच्यावर यशस्वी मात करून 'मेरा भारत महान' हे स्वप्न साकार करणे सोपे नव्हते, पण पंडितजींनी न डगमगता ती सर्व आव्हाने स्वीकारली आणि पंचशील तत्त्वांच्या साक्षीने भारताच्या विकासाचा शुभारंभ केला. आपले सहकारी व जनता यांच्या मदतीने त्यांनी पंचवार्षिक योजनांची कार्यवाही सुरू केली. त्याचप्रमाणे भारताच्या संरक्षणक्षमतेची पायाभरणी करण्यासाठी त्यांनी नॅशनल फिजिकल लॅबोरेटरी, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, आय.आय.टी. यांची स्थापना केली. त्यासाठी त्यांनी प्रख्यात वैज्ञानिक डॉ. होमी भाभा तसेच विदेशी शास्त्रज्ञ यांचे सहकार्य घेऊन तरुण भारतीय शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ, यांची पिढी तयार केली. इतकेच नव्हे, तर त्यांच्या मदतीने ऊर्जा निर्मितीचे मोठमोठे प्रकल्प पूर्णत्वाला नेले.

भाक्रा-नानगलच्या प्रचंड धरणामुळे ऊर्जा निर्मिती बरोबरच शेतीचीही प्रगती होऊ शकते, हे पाहून शास्त्रज्ञ आणि जनता यांच्या मनात जो आत्मविश्वास निर्माण झाला, त्यामुळे भारताच्या भावी प्रगतीची उत्तम पायाभरणी झाली.

इंग्रजांच्या मगरमिठीतून मुक्त होऊन आत्म-निर्भरतेच्या नव्या वाटा शोधणाऱ्या भारताला

पंडित नेहरूंनी पंतप्रधान या नात्याने दिलेले महत्त्व आणि आत्मविश्वास यांची संजीवनी निःसंशय अनमोल आहे.

देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अविश्रांतपणे झटणाऱ्या, सतत कार्यमग्न असणाऱ्या पंडितजींच्या मनातील एक कोपरा मात्र बालकांसाठी राखून ठेवलेला होता. आपल्या अत्यंत व्यस्त कार्यक्रमांतून रोज थोडातरी वेळ ते बालकांसाठी राखून ठेवीत असत. मुलांशी खेळण्यात ते रमून जात असत. भारतातील सर्व बालकांचे 'चाचा नेहरू' आवडते होते. त्यांच्या बालकप्रेमाची ही एक आठवण :

नागपूरला काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. दिवाळीच्या सुट्ट्या असल्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींना अधिवेशन मंडपात स्वयंसेवकांचे काम देण्यात आले होते. किती तरी प्रसिद्ध व्यक्तींना जवळून पहायला मिळत असल्यामुळे सर्वजण ते काम उत्साहाने करायचे. मी त्या वेळी नागपूरच्या एल.ए.डी. कॉलेजमध्ये बी.ए. च्या शेवटच्या वर्षाला शिकत होते. सुट्टीनंतर परीक्षा असल्यामुळे आम्ही काही मैत्रिणी कॉलेजच्या वसतिगृहावर थांबलो होतो. आम्हांला हे स्वयंसेविकांचे काम म्हणजे एक पर्वणीच होती. त्यातून स्टेजजवळ उभे राहण्याचे काम असल्यामुळे पंडित नेहरूंना जवळून बघता येत असे.

अधिवेशनाचे पहिले सत्र संपले, की कॉलेजची बस आम्हांला वसतिगृहात पोहोचवीत असे. त्या वेळी सेमिनरी हिल्सच्या त्या भागात बऱ्यापैकी जंगल होते. त्यामुळे सर्वत्र शुकशुकाट असायचा.

पंडितजींचा मुक्काम त्याच भागातील एका अतिथी–गृहात होता. आमची बस आणि त्यांच्या गाड्या बहुतेक एकाच वेळी, रोजच समोरासमोर येत. त्या जाईपर्यंत आमची बस थांबून राही.

त्या दिवशी पंडितजींची जीपगाडी समोर आल्यामुळे आमची बस थांबली आणि त्यांची गाडीही थांबली. त्यामुळे त्यांच्या गाडीमागे असलेला इतर गाड्यांचा ताफाही थांबला. काय झाले म्हणून सर्वजण अस्वस्थ झाले. तेवढ्यात पंडितजी झटकन गाडीतून खाली उतरले आणि झपझप चालू लागले. त्यांच्या अंगरक्षकांची त्रेधा तिरपीट उडाली.

सागाच्या वृक्षांनी वेढलेल्या त्या निर्जन भागात एक लहानसे घर होते. बहुतेक ते एखाद्या वनरक्षक कर्मचाऱ्याचे असावे. घराच्या समोरच्या एका झाडाखाली नऊ–दहा वर्षांची झिपरी, मळकट फ्रॉक घातलेली एक मुलगी उभी होती. तिच्या हातात सुकलेल्या फुलांचा हार होता.

पंडितजी तिच्याजवळ गेले आणि खाली वाकले. कोमेजलेल्या फुलांचा तो हार त्यांनी तिच्याकडून स्वतःच्या गळ्यात घालून घेतला. आपल्या कोटावरचा लाल गुलाब काढून तिच्या हातात दिला आणि तिला प्रेमाने थोपटून ते पुन्हा झपझप चालत आले आणि उडी मारून गाडीत बसले.

अवघ्या पाच मिनिटांत घडलेला हा प्रकार आज इतक्या वर्षांनंतरही जसाच्या तसा डोळ्यांसमोर उभा राहतो. ती काळीसावळी, झिपरी, बापुडवाणी मुलगी पंडितजींना नेमकी दिसली आणि त्यांनी लगेच गाडी थांबविली. पंडितजींना लहान मुलांविषयी वाटणाऱ्या जिव्हाळ्याचे, ममतेचे ते निरागस दर्शन सर्वांनाच अंतर्मुख करून गेले.

असे होते त्यांचे निर्मळ बालकप्रेम! म्हणूनच १४ नोव्हेंबर हा पंडित नेहरूंचा जन्मदिवस 'बालदिन' म्हणून साजरा केला जातो.

# स्वतंत्र भारताचा निर्माता...

**संदीप वाक्चौरे**
जि. शि. व प्र. संस्था संगमनेर, जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ८३२९३२८४७०

दीडशे वर्षांच्या गुलामीनंतर भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. भारतीय समूहाच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जबाबदारी स्वीकारली होती. त्यांना या देशाची प्रशासकीय घडी बसवायची होती. जगाच्या पाठीवर भारताची स्वतःची प्रतिमा निर्माण करण्याचे आव्हान त्यांच्यापुढे होते. रोजगारांची निर्मिती, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, साक्षरता, उद्योगधंदे निर्माण करणे, नवसमाज निर्माण करणे आणि मनामनात स्वप्न पेरणे आणि त्याचबरोबर विज्ञानाची कास धरणारा समाज उभा करणे यांसारखी अनेक आव्हाने त्यांच्यापुढे होती. त्यांना सामोरे जाताना नव्या युगाची आव्हाने पेलणारा समाज उभा करत, भारताला एक उच्च स्थान प्राप्त करून देणारे पंडित जवाहरलाल नेहरू हे भारतासाठी खऱ्या अर्थाने राष्ट्र निर्माताच होते.

> *पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान. आजच्या विकसनशील भारताच्या पायाभरणीत त्यांचे योगदान फार मोठे आहे. त्याचे स्मरण करून देणाऱ्या या लेखात त्यांची विचारसरणी, राष्ट्रवादाचा विचार, पंचशील तत्त्वे, वैज्ञानिक दृष्टिकोन याविषयी...*

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक अग्रगण्य नेतृत्त्व म्हणून पंडित नेहरूंकडे पाहिले जाते. स्वातंत्र्यानंतर सुमारे अठरा वर्षे भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी कारभार पाहिला. भारताच्या विकासाचा पाया त्यांनी रोवला असे सांगितले जाते, याचे कारण त्यांच्या आरंभीच्या धोरणांनी देशाच्या विकासाचा आलेख निर्माण करता आला. त्यांच्या मनात एक स्वप्न होते. त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळायच्या आदल्या रात्री केलेल्या भाषणात आशावाद व्यक्त केला होता. त्यात ते म्हणाले होते, ''की फार वर्षांपूर्वी आपण नियतीबरोबर करार केला होता. वेळ ठरविली होती आणि आता वचनपूर्तीची वेळ आली आहे. हे वचन पूर्णपणे नसेल, पण बऱ्याच प्रमाणात आपण पूर्ण करणार आहोत. आज मध्यरात्री जग झोपी जाईल तेव्हा भारत नवचैतन्याने जागृत होईल. इतिहासात असा एखादा क्षण येतो, की जेव्हा आपण जुन्यातून नव्यात प्रवेश करतो. तेव्हा एखादे युग संपते आणि दीर्घकाळ दडपलेल्या राष्ट्राच्या आत्म्याला हुंकार देण्याची संधी मिळते.'' या आशावादातून आपल्याला कोणत्या दिशेने प्रवास करायचा आहे हे अधोरेखित झाले होते. त्या दिशेने प्रवास करण्याच्या प्रयत्नात आपण बरेच काही मिळविले आहे. वर्तमानात जे काही उत्तम निपजलेले दिसते त्यामागे नेहरूंचा त्याग आणि विचार आहे हे आपण विसरू शकत नाही.

इंग्लंडसारख्या देशात त्यांनी सात वर्षे शिक्षणासाठी व्यतीत केली होती. त्या शिक्षणाच्या प्रवासात त्यांची दृष्टी विकसित होण्यास मदत झाली. तेथील उदारमतवादी

दृष्टिकोन, आधुनिक पाश्चात्त्य विचारसरणी, व्यक्तिस्वातंत्र्यवादी दृष्टिकोन यामुळे त्यांची स्वतःची विचारदृष्टी तयार होण्यास मदत झाली होती. त्यांना बर्नार्ड शॉ आणि बर्ट्रांड रसेल यांच्या साहित्याने प्रभावित केले होते. त्यातून साम्यवादाविषयी प्रीती निर्माण होण्यास मदत झाली. त्यांनी भारतात येताच पुरोगामी विचाराने पावले टाकण्यास सुरुवात केली. वकील म्हणून आल्यानंतर त्यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठीच्या चळवळीत योगदान दिले. महात्मा गांधीजींची पहिली भेट झाली, ती त्यांच्यासाठी कायमची सावली म्हणून सोबत राहिली. दोघांच्या व्यक्तिमत्त्वात अंतर होते, पण तरी महात्मा गांधीजीचा प्रभाव कायम राहिला होता. त्यांनी त्या प्रभावातून स्वातंत्र्याच्या कालखंडात आणि त्यानंतर देखील महात्मा गांधीजींच्या विचारांची कास सोडली नाही.

पंडित नेहरूंचा राष्ट्रवादाचा विचार देखील इतरांहून वेगळा होता. त्यांच्या प्रत्येक कृतीत आणि विचारात माणूसपणाचे प्रतिबिंब होते. राष्ट्रवाद ही लोकांना हेलावून सोडणारी एक सामर्थ्यशाली भावना आहे. तिच्याभोवती लोकांच्या संवेदना, परंपरा गुंफलेल्या असतात त्यामुळे समान जीवनाची व समान उद्दिष्टांची जाणीव निर्माण होत असते. राष्ट्रवाद लोकांची मने भारावून टाकतो. समान उद्दिष्टांनी समाजाला एकत्र आणतो. त्यांना कार्यप्रवण बनवितो म्हणूनच राष्ट्रवाद ही शक्ती आहे. त्यांच्या राष्ट्रवादात माणूस केंद्रस्थानीच राहिला आहे. त्यात जात, धर्म, पंथ यांचा विचार अधोरेखित होऊ शकला नाही. त्यांच्या राष्ट्रवादात स्वराज्य व अहिंसा यांचा विचार प्रतिबिंबित झालेला पहावयास मिळतो. त्या वेळी स्वराज्यात संपूर्ण स्वातंत्र्य, राजकीय सहभागाचा हक्क होता. यात समाजातील सर्व घटक सहभागी होऊ शकत होते. त्याचबरोबर अहिंसेचा विचार त्यांनी पुढे नेला. अतिरेकी व आक्रमक राष्ट्रवादाला त्यांचा सातत्याने विरोध राहिला आहे. भारताचे वास्तव डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी देश एकसंघ ठेवण्यासाठी 'विविधेतून एकता' निर्माण करण्याचा विचार अधोरेखित केला आहे त्यामुळे हा देश विविधतेने नटलेला असूनही, एकसंधतेने प्रवास करू शकला. त्यामागचे रहस्य नेहरूंनी आरंभी घेतलेल्या भूमिकेत दडलेले आहे हे लक्षात घ्यायला हवे.

पंडित नेहरूंचा साम्राज्यवादाला विरोध होता. प्रत्येक राष्ट्राला स्वयं निर्णयाचा अधिकार असलाच पाहिजे. स्वातंत्र्याचा प्रश्न हा आमच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे, पण त्याची व्याप्ती केवळ भारतापुरती नाही तर पारतंत्र्यात असलेल्या प्रत्येक राष्ट्राशी निगडित आहे. त्यांच्या या विचारांचा परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणात देखील प्रतिबिंबित झालेला आपणास पहावयास मिळतो. पंडित नेहरूंच्या एकूण भूमिकेत शांतता आणि मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. राष्ट्रवादाकडे संकुचित दृष्टिकोनाने पाहिले तर जागतिक शांतता धोक्यात येईल आणि त्याच वेळी मानवजातीचे भवितव्य देखील अडचणीत सापडेल. त्यामुळे अवघ्या जगाने आपसातील मतभेद दूर करीत मानवाच्या कल्याणाचा विचार करीत एकत्रित येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली होती. विज्ञानाच्या प्रगतीने अवघे जग जवळ येत आहे. विज्ञानाच्या शोधांचा उपयोग मानवाच्या कल्याणासाठी झाला पाहिजे. विज्ञानातील शोधांचा लाभ घेत राष्ट्राराष्ट्रांत आणि माणसांमाणसांतील सामंजस्य आणि सद्‌भाव वाढीस लागण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती.

पंडित नेहरूंच्या एकूण विचारधारेत शांतता केंद्रीभूत होती म्हणून लोकशाही स्वीकारताना देखील त्यांनी विकासाचा हा राजमार्ग असल्याचे नमूद केले होते. इंग्लडमध्ये शिक्षण घेत असताना त्यांनी अनेक अनुभव घेतले होते. त्याची छाया त्यांच्या मनावर कायम होती त्यामुळे भारतात देखील तशी व्यवस्था उभी करताना सतत उदारमतवादी भूमिका कायम ठेवली. लोकशाही ही केवळ शासन पद्धती नाही, तर ती एक जीवनप्रणाली

आहे. लोकशाही ही सभ्य व सुसंस्कृत जगण्याची एक पद्धती आहे. लोकशाहीत व्यक्तीचे स्वातंत्र्य व हक्क अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी सातत्याने भूमिका घेतली आहे. लोकशाहीच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य आणि विकासाची संधी उपलब्ध करून दिली आहे. लोकशाहीत विरोधकांच्या मताचाही आदर केला पाहिजे. लोकशाहीत प्रत्येकाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याबरोबर प्रत्येकाला विचाराचे स्वातंत्र्य याला त्यांनी महत्त्व दिले होते. यातून निकोप लोकशाहीच्या विकासाचा पाया उभा राहतो म्हणून त्यांनी भारतात स्वातंत्र्यानंतर समाजवादी लोकशाहीचा, विचारधारेचा स्वीकार केलेला दिसून येतो. मात्र त्यांनी कधीच सशस्त्र क्रांती आणि हिंसाचारावर विश्वास ठेवला नाही. कोणताही प्रश्न हा अहिंसक मार्गाने सोडविला जाऊ शकतो अशी त्यांची सातत्याने धारणा होती.

भारताच्या विकासासाठी भूमिका घेताना त्यांनी सतत नियोजनबद्ध विकासाची भूमिका घेतली आणि या आर्थिक नियोजनाचा लाभ हा देशातील सामान्य नागरिकांना व्हायला हवा यासाठी ते सातत्याने भूमिका घेत राहिले. त्याचबरोबर भारताच्या परराष्ट्र धोरणावर त्यांच्या विचाराची छाप पडलेली पहावयास मिळते. भारतीय परराष्ट्र धोरणाला निश्चित अशी तात्त्विक बैठक होती. त्यामुळे आपण स्वातंत्र्यानंतरही पुढे चालत राहिलो तरी त्यांच्या धोरणाचा मागोवा घेण्याची गरज सतत पडतेच. त्यांनी आंतरराष्ट्रीय शांततेसाठी भूमिका घेतली आहे. विज्ञानाने निर्माण केलेल्या अण्वस्त्रांच्या–द्वारे जगाला गंभीर परिणामाला सामोरे जावे लागेल हा धोका त्यांनी ओळखला होता. त्यामुळे विज्ञान निर्मित अशा साधनांचा वापर आणि दहशतवादाने जग अशांततेच्या खाईत लोटले जाईल याचा इशारा त्यांनी वेळोवेळी दिला होता. जगात अनेक राष्ट्रांची विचारधारा, उद्दिष्टे भिन्न असली तरी जगातील शांततेसाठी मात्र सर्वांनी एकत्रित भूमिका घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. एकमेकांच्या सहकार्याने शांतता आणि प्रगती साधावी लागणार आहे हे त्यांनी ठामपणे सांगितले.

त्यांच्या धोरणात आणखी एक वैशिष्ट्य होते ते म्हणजे अलिप्ततेचे. साम्राज्यवाद आणि वसाहतवाद याला सतत त्यांचा विरोध होता, त्याचे कारण साम्राज्यवादाचे उच्चाटन झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत शांतता प्रस्थापित होणार नाही.

शांतता केंद्रस्थानी ठेवताना त्यांनी पंचशील तत्त्वांचा पुरस्कार केला. भारत व चीन करारात नमूद केले आहे, की परस्परांच्या प्रादेशिक एकात्मतेबद्दल, सार्वभौमत्वाबद्दल परस्परांनी आदर बाळगणे. परस्परांच्या प्रदेशावर आक्रमण न करणे, अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे, राष्ट्रीय समानता व परस्परांचे हित सांभाळणे आणि शांततामय सहजीवन आणि आर्थिक सहकार्य या तत्त्वांचा स्वीकार करणे. या तत्त्वांच्या केंद्रस्थानी शांतता आणि मानवी विकास आहे. हा विचार अत्यंत आदर्शवादी आहे. या पंचशीलांना अनुसरून जगातील राष्ट्रे मार्गक्रमण करतील तर जग महायुद्धाच्या दिशेने कधीच जाणार नाही.

भारताच्या विकासाकरिता त्यांनी विज्ञान, संशोधन, तंत्रज्ञान क्षेत्रात विविध संस्था उभ्या केल्या आहेत. त्यांनी उभ्या केलेल्या या संस्थांमुळे आपला प्रगतीचा आलेख उंचावता गेला. पंडित नेहरूंच्या नियोजनात्मक दृष्टिकोनात आपल्याला जो समाज निर्माण करायचा आहे, प्रगती साधावयाची आहे. ती माणसांच्या विकासा–करिता हा मानवी दृष्टिकोन राहिल्याने विकासाची फळे सर्वांना चाखता आली. पंडित नेहरूंनी घालून दिलेल्या पायंड्यांमुळे आपण विकासाची फळे चाखत आहोत. त्यांच्या पाऊलवाटेने चालत राहणे हीच त्यांना आदरांजली ठरणार आहे.

■■■

# हिंमत हारलो नाही!

**इंद्रजित भालेराव**
एकनाथनगर, जि. परभणी
भ्रमणध्वनी : ८४३२२२५५८५

माझे शालेय प्रगतिपुस्तक तुमच्यासमोर ठेवले, तर तुम्हांला नक्की हसू येईल. पूर्वी चौथी, सातवी या परीक्षा अवघड समजल्या जात. त्यांना बोर्डाची परीक्षा असे म्हणत. इतर वर्गांच्या परीक्षा शाळेतच घेतल्या जात. मात्र या बोर्डाच्या परीक्षा दुसऱ्या शाळेत जाऊन नवख्या गुरुजींसमोर द्याव्या लागत. त्यामुळे कच्ची मुले तेथे हमखास नापास होत. त्यांचे शिक्षण तेथेच थांबे. मी चौथीला फुकट पास, सातवीला ढकल पास आणि दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत चक्क नापास झालो होतो.

१९७३ साली मी चौथीला होतो. मला बोर्डाच्या परीक्षेची भीती वाटत होती, पण त्या वर्षी महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला आणि शासनाने सर्व परीक्षा रद्द केल्या. मागील वर्षातील विद्यार्थ्यांना पुढील वर्गात बसवायला सांगितले. त्यामुळे परीक्षा न देताही त्या वर्षी मी फुकट पास झालो.

> *'अपयश ही यशाची पायरी असते' हा सुविचार आपण जाणतो, पण याचा अर्थ असा नव्हे की, नापास व्हायला हरकत नाही! याचा अर्थ असा घ्यायचा की अपयश आले तरी खचून जायचे नाही. हिंमत सोडायची नाही. प्रयत्नांचे महत्त्व त्यात अंतर्भूत आहेत, म्हणजेच जिद्दीने मार्ग काढला की यश येते. त्याविषयी...*

मी सातवीच्या वर्गात गेलो तेव्हा आम्हांला शिकवायला राजहंसाच्या स्वभावाचे पण आडनाव कावळे असलेले एक गुरुजी होते. तेच आम्हाला परीक्षेच्या गावी घेऊन गेले. त्यांनी आम्हांला सर्व प्रकारची मदत केली. आम्ही नापासच होणार, असे आम्हांला वाटत होते, पण निकाल लागला आणि आम्ही पास झालो. गुरुजींना आम्ही विचारले, 'आम्ही कसे काय पास झालो?' तेव्हा गुरुजी म्हणाले, 'तुम्ही थोड्या थोड्या मार्कांनी नापासच झाला होतात, पण तुम्हांला कमी पडलेले मार्क शाळेने तुम्हांला ग्रेस मार्क दिले.' 'आम्ही विचारले, म्हणजे काय?' तर ते म्हणाले, 'आम्ही तुमच्या डोळ्यांत काही स्वप्नं पाहिली होती. तुम्ही नापास झालात तर ती स्वप्नं इथंच संपून जातील म्हणून आम्ही तुम्हांला थोडे थोडे मार्क्स वाढवून पुढील वर्गात ढकलले. तुम्ही ढकल पास झालात.'

१९८९ साली मी दहावीच्या वर्गात होतो. तेव्हा पुन्हा एकदा बोर्डाची परीक्षा आली. त्या वर्षी महाराष्ट्रात दुष्काळ पडला, राजहंसाच्या स्वभावाचे कुणी कावळे गुरुजी भेटले. त्यामुळे आम्ही ना फुकट पास झालो ना ढकल पास झालो. सरळ सरळ नापास झालो.

तेव्हा वडिलांनी जवळ बोलावले आणि विचारले, ''तुम्ही आता काय करणार आहात?'' मी म्हणालो, ''आपण जे सांगाल ते'', वडील म्हणाले, ''तुम्ही आता या वर्षी गुरं राखा.'' मग त्या वर्षी वर्षभर मी गुरं राखली. मला गाई राखण्याचे काम आवडत असे. त्यामुळे मी इतकी चांगली गुरं राखली की कुणी गुराख्यांची स्पर्धा घेतली असती तर महाराष्ट्रात माझा क्रमांक पहिला आला असता. मी कधीही गाईला काठीने मारले नाही. मी पुढे चालायचो आणि गाई माझ्या पाठीमागं यायच्या. गाय पीक खाऊ लागली आणि ऐकेना

झाली तर मी बांधावर यायचो आणि रडायचो. माझी गाय माझ्या जवळ येऊन उभी राहायची. मला वाटायचे, आपण भाकरी खातो आणि गाई गवत खातात. उलटं का होऊ नये? गाईने भाकर का खाऊ नये आणि आपण गवत का खाऊ नये? आईने मला सोबत बांधून दिलेली भाकरी मी गाईंना चारायचो आणि मी दिवस दिवस गाई मागं गवताचे तुरे खात फिरायचो. गवत इतके चवदार असते आणि त्याला इतक्या चवी असतात हे मला तेव्हा प्रथमच कळले. सांगा बरं मला, अशी गुरं कोणी राखली असतील का? आलो असतो की नाही मी महाराष्ट्रात पहिला? पण वडिलांनी काही माझे कौतुक केले नाही. दुसरा गुराखी लावला असता तर त्याला हजारभर रुपये द्यावे लागले असते, पण वडिलांनी मला एकही पैसा दिला नाही कारण मी घरचाच गुराखी होतो ना, म्हणून मला त्यांनी फुकट राबविले.

पण मी वर्षभर गुरं राखली, त्याची मजुरी वसूल केली. ही मजुरी मी वडिलांकडून नाही तर महाराष्ट्र शासनाकडून वसूल केली. पुढे जेव्हा मी लेखक झालो तेव्हा वर्षभर ही जी गुरं राखली त्या अनुभवावर 'गाई घरा आल्या' नावाचे पुस्तक लिहिले. १९९५ साली ते प्रकाशित झाले. त्या वर्षी मराठीत प्रकाशित झालेल्या शेकडो पुस्तकांतून उत्कृष्ट ललित गद्य म्हणून त्याला पहिला पंधरा हजार रुपयांचा पुरस्कार मिळाला. तेव्हाचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी मला मुंबईत विशेष समारंभात तो प्रदान केला.

म्हणूनच मी मुलांना नेहमी सांगत असतो की, आयुष्यात आपल्यावर कशी वेळ येईल ते काही सांगता येत नाही, पण आपण हिंमत सोडायची नाही. माझ्यावर तेव्हा गुरं राखण्याची वेळ आली म्हणून मी हिंमत हारलो असतो तर, आज कार्यक्रमाचा प्रमुख पाहुणा म्हणून येथे आलो असतो का? आपल्या वाट्याला जे काम आले ते मी जीव लावून केले. ते काम उत्तम करण्याचा प्रयत्न केला. त्यात भरपूर आनंद घेतला. मला जर गुरं राखण्याचा अनुभव घेता आला नसता तर मला 'गाई घरा आल्या' हे पुस्तक लिहिता आले असते का? मुख्यमंत्र्यांनी सत्कार केला असता का? आणि आज तुमच्या समोर पाहुणा म्हणून उभा राहिलो असतो का? म्हणून मी मुलांना नेहमी सांगत असतो की, समोर उभ्या राहिलेल्या प्रसंगाला हिमतीने सामोरे जा आणि त्याही अनुभवांचे आयुष्यात सोने करा.

मी जेव्हा तुम्हांला माझ्या पास नापासाची गोष्ट सांगत होतो तेव्हा तुम्ही खुदुखुदू हसत होतात, पण त्याच वेळी माझं पाठांतर किती होते ते सांगितले तर तुम्हांला त्याचे नवल वाटेल. मी सातवीच्या वर्गात असताना मला संपूर्ण गीता पाठ होती. आठवीच्या वर्गात असताना मला चक्रधरांची साडे दहाशे सूत्रे पाठ होती. नववीत असताना मला बहिणाबाईंच्या सगळ्या कविता पाठ होत्या. दहावीत असताना मला पहिलीपासून दहावीपर्यंतच्या संपूर्ण कविता आणि संतांचे शेकडो अभंग पाठ होते. जात्यावरच्या ओव्या तर अगणित पाठ होत्या. औरंगाबाद विद्यापीठात मी एम. ए. ला गेलो तेव्हा मला लोकसाहित्य शिकवायला डॉ. प्रभाकर मांडे नावाचे प्राध्यापक होते. वर्गात त्यांना एखाद्या ओवीची गरज पडली तर तशा अर्थाच्या दहा ओव्या मला पाठ असायच्या. सर म्हणायचे, ''तुला किती ओव्या पाठ आहेत? लिहून काढ.'' मी लिहायला सुरुवात केली तर मला चार रात्री आणि चार दिवस लागले. लिहून झाल्यावर मी मोजल्या तर त्या दोन हजार पेक्षा जास्त भरल्या. इतके सारे माझे पाठांतर होते. तरीही मी फुकट पास, ढकल पास आणि नापास होत होतो.

मी नेहमी म्हणत असतो की, मी फुकट पास, ढकल पास आणि नापास होत होतो कारण मला काय येतं हे तपासणे येथील शिक्षण व्यवस्थेत नव्हते आणि शिक्षण व्यवस्थेची गणितं मला कळत नव्हती म्हणून माझ्यावर फुकट पास, ढकल पास व नापासचे डाग लागत होते. नाही तरी माझं मेरीट मी नेहमीच सिद्ध करीत आलेलो आहे.

मी दहावीच्या वर्गात जरी नापास झालो होतो तरी मी ज्या शाळेत होतो तेथून अठरा मुले त्या

**(पृष्ठ क्र. २४ वर)**

# शिक्षकांपुढील आव्हाने!

**डॉ. ह. ना. जगताप**
१२ ब सन्मतिनगर, विजापूर रोड, जि. सोलापूर
भ्रमणध्वनी : ९८२२६१५४६४

आपण शाळेत शिकत असताना आपले शिक्षक इतिहासातील विविध घटनांचा संदर्भ सांगताना इ. स. पूर्व व इ. स. अशा भाषेत सांगत असत तसेच काहीसे आता कोरोनापूर्व व कोरोनोत्तर असे संदर्भ द्यावे लागतील की, काय अशी परिस्थिती निदान शिक्षणक्षेत्रात तरी निर्माण झाल्याचे जाणवते आहे. अत्यंत उत्साहाने अगदी नाचत, बागडत शिकणारा ३०-४० विद्यार्थ्यांचा वर्ग आणि अध्यापनात दंग असलेले शिक्षक असे चित्र आता इतक्यातच पहायला मिळेल असे वाटत नाही.

*एकविसावे शतक आव्हानांचे शतक आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. शिक्षण क्षेत्रातही शिक्षकांपुढे नवनवीन आव्हाने आहेत. कोरोनामुळे, ऑनलाईन शिक्षणामुळे, विद्यार्थी व शिक्षक यांचा संपर्क नसल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. शाळा सुरू झाल्यावर या प्रश्नांना कौशल्याने तोंड द्यावे लागणार आहे. या प्रश्नांचे स्वरूप, त्याला तोंड देण्याची तयारी याविषयी...*

या कोरोनाच्या काळात शाळा बंद असल्या तरी आपण शिक्षक मित्रांनी शिक्षण सुरू ठेवले आहे आणि यासाठी खूप मोठ्या प्रमाणात आपण तंत्रज्ञानाचा वापर करीत आहोत. शिक्षकांच्या या प्रयत्नांना खरोखरच सलाम! प्रत्येकाच्या तोंडी zoom, google meet, शैक्षणिक व्हिडिओ, वेबसाईट्स, यू-ट्यूब, चॅनेल यांचीच चर्चा चाललेली दिसून येते. या विविध माध्यमांतून काही शिक्षक तर अगदी गावातील सार्वजनिक ठिकाणावरून लाऊड स्पीकरच्या साहाय्याने अध्यापन करीत असल्याचे वाचनात आले. सर्वच शिक्षक या कार्यासाठी अभिनंदनास पात्र आहेत. असे असले तरी आता शिक्षकांपुढे काही आव्हाने निर्माण झालेली आहेत. अगदी लगेचच ज्या गोष्टीला तोंड द्यावे लागणार आहे ती म्हणजे विद्यार्थ्यांनी या ५-६ महिन्यांत किंवा कदाचित पुढेही काही महिने तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जे शिक्षण घेतले आहे त्याचे मूल्यमापन कदाचित मार्च, एप्रिलमध्ये होईल. त्या वेळी पारंपरिक पद्धतीने लेखी स्वरूपात परीक्षा घेतली जाईल. अशा वेळी या विद्यार्थ्यांना लेखन करणे कठीण होणार आहे कारण मुलांची लेखनाची, आकडेमोडीची सवय कमी झालेली आहे म्हणून साधारणपणे शाळा जानेवारीपर्यंत सुरू झाल्या तर या मुलांचा लेखन सराव करून घेणे व प्रत्यक्ष उदाहरणे सोडविण्याचा सराव करून घेणे आवश्यक ठरणार आहे. याशिवाय, ज्या विद्यार्थ्यांना विविध कारणांमुळे तंत्रज्ञानाचा आधार घेऊन शिक्षण घेता आले नाही व ज्यांनी असे शिक्षण घेतले आहे, यांच्यातील दरी भरून काढावी लागणार आहे.

गेल्या पाच-सहा वर्षांत महाराष्ट्रात तरी मोठ्या संख्येने शिक्षकतंत्रस्नेही झाले आहेत, तसेच या कोरोना काळात देखील बऱ्याच शिक्षकांनी तंत्रज्ञानावर प्रभुत्व मिळविले आहे व त्याचा वापरही केला आहे.

मला सारखी भीती वाटते की हे तंत्रज्ञान शिक्षकांवरच स्वार होणार नाही ना! शिक्षकांनी हे लक्षात घ्यावे की तंत्रज्ञान हे सूक्ष्म साधन आहे. (विशेषतः प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी) शिक्षकांचे समोरासमोरचे अध्यापन हेच सर्वांत महत्त्वाचे आहे कारण या वयातील विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून केवळ ज्ञान मिळणे गरजेचे नसते, तर शिक्षकांचे प्रेम, जिव्हाळा, आपुलकी या गोष्टींची गरज असते. त्यामुळे शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर काही मर्यादितच करावा. तंत्रज्ञानाचे अध्यापनात खूप महत्त्व आहे. हे मान्य करून देखील शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी विविध मार्गांनी निकट संपर्कात राहणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाद्वारे अध्ययनाकडून प्रत्यक्ष वर्गाध्यापनाकडे आकर्षित करणे हे देखील शिक्षकांपुढे एक आव्हान आहे. अगदी यू-ट्यूब चॅनेलवरील व्हिडिओ किंवा इंटरनेटवरील वेबसाईटवरून अत्यंत आकर्षक स्वरूपातील माहिती घेण्याची सवय विद्यार्थ्यांना लागलेली असू शकते म्हणून आपले वर्गाध्यापन अधिकाधिक प्रभावी व आकर्षक कसे होईल याचा विचार शिक्षकांना करावा लागेल, अन्यथा विद्यार्थ्यांचे वर्गातील अध्ययन आनंददायी होणार नाही.

याबरोबरच आपण आता नवीन शैक्षणिक धोरण स्वीकारले आहे. विद्यार्थ्यांना चिकित्सक विचार करायला शिकविणे ही या धोरणातील एक महत्त्वपूर्ण गोष्ट आहे म्हणूनच आता विद्यार्थ्यांना केवळ माहिती देण्यापेक्षा त्यांना विचार करायला प्रवृत्त करणे हे आपल्या पुढील एक आव्हान असणार आहे. सर्वसाधारणपणे आपण विद्यार्थ्यांना काही सांगावे व ते विद्यार्थ्यांनी स्वीकारावे अशी आपली अपेक्षा असते, त्यातूनच विद्यार्थ्यांनी आज्ञाधारक असावे अशी आपली रास्त अपेक्षा असते, परंतु आता हा दृष्टिकोन थोडासा बदलायला हवा. विद्यार्थ्यांनी शिक्षकांना काही प्रश्न विचारावेत हे आपल्याला फारसे मानवत नाही, परंतु आता विद्यार्थ्यांना आपणच अशी सवय लावायला हवी. कोणतीही गोष्ट शिक्षकांनी सांगितली म्हणून किंवा पुस्तकात आहे म्हणून न स्वीकारता त्यांना स्वतः ती गोष्ट तर्काच्या साहाय्याने पडताळून पहावी अशी सवय त्यांना लावणे हे आपले कर्तव्य असणार आहे कारण ज्ञाननिर्मिती व्हायची असेल तर, का? कसे? असे प्रश्न विद्यार्थ्यांना पडायलाच हवेत. असे चिकित्सक विचार करणारे विद्यार्थी तयार करणे हे आपल्या पुढचे एक आव्हान आहे. त्यासाठी अध्यापनातून माहिती कमी करून विद्यार्थ्यांना विचारप्रवृत्त करण्यासाठीची पुस्तके, पद्धती व तंत्रे विकसित करणे हे शिक्षकांचेच काम आहे.

आपल्यापुढे असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काहीतरी वेगळे करण्याची क्षमता असतेच. त्यालाच आपण सर्जनशीलता असे म्हणतो, परंतु बऱ्याच वेळा आपल्याला नेमून दिलेल्या वेळापत्रकांच्या जंजाळातून विद्यार्थ्यांच्या अशा सर्जनशीलतेकडे लक्ष द्यायला आपल्याला वेळच मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या वेगळ्या पद्धतीने विचार करण्याला प्रवृत्त करणे ही सर्जनशीलता विकसित करण्यासाठीची आवश्यक बाब असते. आपण मात्र साचेबंद पद्धतीला, तंत्राला, विचाराला चिकटून बसलेले असतो. एखाद्या विद्यार्थ्याने एखाद्या प्रश्नाचे वेगळ्या पद्धतीने उत्तर दिले तर ते आपणास फारसे रुचत नाही. आता ही विचारसरणी बदलायला हवी. सर्जनशीलतेला प्राधान्य द्यावे अशी अपेक्षा नवीन शैक्षणिक धोरणात देखील व्यक्त केलेली आहे.

आता तर आपण ३+ वर्षांपासून शिक्षणाचा अधिकार बालकांना दिलेला आहे. आपणांकडे येणारी मुले ही विविध जाती-धर्मांची, वेगवेगळ्या समाज गटातील, विविध भौगोलिक परिस्थितीतील आणि विविध

सांस्कृतिक पार्श्वभूमी असणारी असतात. त्यांच्यातील ही विविधता नष्ट करून त्यांना एका विशिष्ट संस्कृतीत आणायचे नाही, तर त्यांच्या भाषा, संस्कृती यांचा आदर करीत अध्ययन–अध्यापन होणे अभिप्रेत आहे. तसेच वर्गात अध्यापन करताना आपण जी उदाहरणे देतो, दाखले देतो, काही प्रायोगिक कृती करतो या सर्व बाबी विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमीशी सुसंगत असल्या तरच त्यातून विद्यार्थ्यांचे अध्ययन घडेल. यासाठी मी अनुभवलेले एक उदाहरण दिले तर ते अप्रस्तुत ठरू नये.

साधारण वीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मी बी. एड. च्या विद्यार्थ्याचा एक पाठ पाहत होतो. ज्या शाळेत हा पाठ होता ती शाळा शहराच्या मध्यभागी होती. त्या शाळेत विशेष करून उच्च मध्यमवर्गीय विद्यार्थी होते. पाठ घेत असताना 'भीष्मप्रतिज्ञा' हा शब्द आला. त्यावेळी शिक्षकाने (आमच्या विद्यार्थ्याने) टी.व्ही. वरील 'महाभारत' या सिरियलचा संदर्भ दिला त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी एकसुरात हो, आम्हांला समजले असे सांगितले. परंतु त्याच वर्गात ५–६ मुले ही झोपडपट्टीतील होती. या गदारोळात ती गप्पच राहिली. त्यांच्या घरी टी.व्ही. नव्हता. त्यामुळे त्यांनी महाभारत पाहिले नव्हते. त्यांना त्या शब्दाचा अर्थ समजलाच नाही. शिक्षक मात्र सर्वांना अर्थ समजला असे समजून पुढे शिकवू लागले. असे होता कामा नये म्हणून शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांची आर्थिक, सामाजिक, भाषिक पार्श्वभूमी लक्षात घ्यायलाच हवी. आता तर आपण सर्वांना गुणवत्तापूर्व शिक्षण देण्याची हमी दिली आहे.

याशिवाय आता आपण शाळेत अभ्यासेतर किंवा अभ्यासपूरक असे कार्यक्रम घेणार नाही, तर या बाबी म्हणजे आता अभ्यासाचाच एक भाग आहेत असे म्हणून आपण त्याकडे पाहणार आहोत. त्यामुळे त्यांचे दुय्यमत्व कमी होईल. कला, नाट्य, संगीत हा आता आपल्या अध्ययन–अध्यापनाचा एक अविभाज्य भाग असणार आहे, जेणेकरून आपले अध्ययन–अध्यापन हे अत्यंत आनंददायी व परिणामकारक होणार आहे. त्यासाठी शिक्षकांना आता याकडेही अधिक लक्ष द्यावे लागणार आहे. जसे : आपण गेल्या पाच–सहा वर्षांत तंत्रस्नेही झालो आहोत तसेच आता आपल्याला कोणती ना कोणती कला आत्मसात करावी लागेल त्यासाठी प्रयत्नशील राहणे अपेक्षित आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी २०२१ पासूनच होणार असल्याचे प्रसिद्ध झाले आहे. यामध्ये सर्वंकष सातत्यपूर्ण मूल्यमापनाबरोबरच, विद्यार्थ्यांना स्वयं–मूल्यमापन करायला शिकविणे व प्रवृत्त करणे, आपल्या सहाध्यायी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करायला शिकविणे व या मूल्यमापनावर विश्वास ठेवण्याची आपण स्वतःही सवय लावून घेणे हे देखील मोठे आव्हान आहे.

आपण सर्व अत्यंत कष्टाळू, प्रामाणिक व प्रयोगशील आहात. आपण ही आव्हाने पेलायला समर्थ आहात असा माझा विश्वास आहे. आपण सर्वजण ही आव्हाने आनंदाने स्वीकारून शिक्षणाची गुणवत्ता नक्कीच वाढवाल अशी अशा करतो. तुम्हा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

■■■

# शिक्षण आणि संस्कार

**डॉ. रमाकांत कोलते**
जिजाऊनगर, यवतमाळ.
भ्रमणध्वनी : ९८५०३२१२१३

मानवी आयुष्य सुंदर व्हावे, सुखी, समाधानी, आनंददायी व्हावे यासाठी पोषक असणारे जे जे घटक आहेत, त्यात शिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे. ज्याचा इतर अशा साऱ्याच घटकांशी सुसंवादी संबंध असण्याची गरज आहे. शिक्षक, शाळा-महाविद्यालये, संस्था आणि सभोवतालचे सामाजिक वातावरण हे सारेच घटक शैक्षणिक जीवनाशी निगडित आहेत. या सर्वांमध्येच असणाऱ्या विधायक विचारशीलतेवर आणि कृतिशीलतेवर शिक्षणाची गुणवत्ता आणि जीवनाचे फलित अवलंबून आहे.

> *शिक्षक फक्त पाठ्यपुस्तक शिकवीत नाहीत. विषयाची आवड, जीवन जगण्याची दृष्टी, जबाबदार नागरिकत्वाची जाणीव आणि सच्चा माणूस बनावा यासाठी करावे लागणारे संस्कार शिक्षक करीत असतात. अशा दातृत्वाने संपन्न असणारे अध्यापक विद्यार्थ्यांना प्रेरणा देतात. त्यातून सापडतो त्यांना यशाचा मार्ग. असे शिक्षण विद्यार्थी घडवीत असतात. त्याविषयी...*

जीवनासमोरचे आदर्श उद्दिष्ट, ध्येय कोणते, या प्रश्नाला ज्ञानेश्वर-तुकाराम ते विनोबा-गांधीजीपर्यंतच्या थोर संतांनी, विचारवंतांनी 'विश्वशांती' हेच उत्तर दिले आहे. निरंतर मानवी कल्याणाचाच त्यांनी विचार केला. त्यात व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र आणि विश्व हे सारेच आले. या सर्व स्तरांवर मानवी कल्याणाचे ध्येय असण्याची गरज आहे. त्यासाठी उचित मार्गदर्शन, योग्य ते मूल्यसंस्कार आणि योग्य तो व्यक्तिविकास हे शिक्षणाचे ध्येय व उद्दिष्ट मानावे लागेल, असे या क्षेत्रातील एक कृतिशील विचारवंत, माजी शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी म्हटले आहे.

डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी भारतीय तरुणांविषयी सकारात्मक विश्वास व्यक्त करून म्हटले आहे की, सन २०१५ पर्यंत भारताच्या लोकसंख्येत निम्म्याहून अधिक प्रमाण तरुणांचे असेल. तरुण पिढी ही शक्ती, जोम, चैतन्य यांचे प्रतीक असते. तरुणांना योग्य दिशा दिल्यास ते राष्ट्रीय स्वाभिमानाचे रक्षक आणि देशातल्या स्वातंत्र्याचे विश्वस्त बनू शकतात. हे कार्य शिक्षणच करू शकते. म्हणूनच शिक्षणाचे महत्त्व निर्विवाद मानावे लागते.

अशा प्रकारचे हे शिक्षण कुठून मिळणार? ते फक्त शाळा व महाविद्यालये यांतूनच मिळते का? तर तसे म्हणता येणार नाही. खरे तर हे सारे विश्वच मानवाला शिक्षकाच्या स्थानी असू शकते. धरती, आकाश, नद्या, सागर, वृक्ष, ऊन, वारा, पाऊस इत्यादींकडून मानवाला शिकता येतेच, पण ते आकलन साऱ्यांनाच होईल असे नाही. मात्र कुटुंबातून आणि मुख्यत: आई-वडील यांच्याकडून मिळणारे शिक्षण पुष्कळ अंशी मनाला संस्कारित करीत असते. या संदर्भात एक सुंदर उदाहरण देता येईल

ते म्हणजे डॉ. राधाकृष्णन यांच्या कुटुंबाचे. त्यांच्या लहानपणी ते मित्रांसोबत खेळत असताना, त्यांना जवळच्या सांडपाण्याच्या नालीत पत्रावळींसोबत चांदीचे वाडगे (कटोरा) पडलेले दिसले. बाल राधाकृष्णनने ते घरी आणले. ते विकून श्रीमंत होता येईल असा बालसुलभ विचार त्याच्या मनात येऊन ते वाडगे त्याने त्याच्या वडिलांना दाखविले. मात्र त्याचे वडील म्हणाले, अरे ती वस्तू आपली नाही. परधन हे मातीसमान, विष्ठेसमान असते. त्याचा हव्यास धरू नये. ते भांडे शेजारच्या श्रीमंताच्या घरचे असून ते पत्रावळीसोबत मोलकरणीने नालीत टाकलेले असावे. असा अंदाज करून मुलाला सोबत घेऊन ते शेजारच्या श्रीमंत गृहस्थांकडे गेले. त्यांनी त्याचे भांडे परत केले. ते गृहस्थ बक्षिसी देऊ लागले तर तीही त्यांनी नम्रपणे नाकारली. उलट त्या श्रीमंताला ते म्हणाले, कर्तव्य बजावताना बक्षिसी कसली? दुसऱ्याची वस्तू परत करायलाच हवी, ही धर्माची शिकवण आहे ना! बाल राधाकृष्णन यास त्याच्या वडिलांनी त्या वेळी जाणीवपूर्वक सोबत नेले होते. त्यांची ती कृती म्हणजे शिक्षणच म्हणायला हवे नाही? अर्थात् ते त्यांच्या आचरणातून मुलाला मिळाले होते. कुटुंबातील मंडळींना अशी जाणीव असणे आणि त्यानुसार त्यांची वागणूक असणे, हे अत्यंत महत्त्वाचे असे संस्कार शिक्षण म्हणता येईल. कुटुंबातील व्यक्तींची सारी वागणूक मुले पाहत असतात. त्यांचा संस्कार मुलांच्या मनावर होत असतो. त्यासाठीच कुटुंबातील वडीलधाऱ्यांना जगण्याचे भान असावे लागते. त्यातून मुलांना चांगल्या प्रेरणा, चांगल्या दिशा, चांगले विचार मिळू शकतात. चांगल्या भावना समजू शकतात. त्या मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला निश्चितच पोषक ठरतात. म्हणूनच कौटुंबिक संस्कारातून नैसर्गिकपणे मिळणारे शिक्षण ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

कुटुंबानंतरचा एक घटक म्हणजे शाळा–महाविद्यालयातील शिक्षण. Good Schools makes a Man. असे विधान बाबा आमटे यांनी एका मुलाखतीत केले होते. संस्कारपूर्ण माणूस घडण्यासाठी शाळा–महाविद्यालयांचेही महत्त्व अपरिमित असे आहे. या शिक्षणातून मुलांना विविध विषयांच्या ज्ञानासोबतच नव्या दिशा दिसतात, प्रेरणा मिळतात, व्यापक दृष्टी प्राप्त होते. त्यातून त्यांच्या स्वभाववृत्तीनुसार, आवडीनुसार त्यांच्या ध्येयाचे पोषण होऊ लागते. यासाठी शिक्षकांची भूमिका महत्त्वाची असते. शिक्षकाला विद्यार्थ्यांप्रति मनस्वी कळकळ असावी लागते. अर्थात त्यांचे शिकविणे तशा प्रकारचे अध्यापनाविषयी असावे लागते. रवींद्र इंगळे उत्रादकर या शिक्षक कवीने आत्मसंवाद करताना म्हटले आहे,

*इतुकेची बळ अंगी यावे फक्त*
*खडूत रक्त उतरावे*
*आणि देह व्हावा मुग्ध*
*खडूतून दूध स्त्रवताना*

जी. ए. कुलकर्णी यांनीही, भिजून–भिजून वाळा सुगंधित व्हावा, तसं देऊन–देऊन अध्यापकाने श्रीमंत व्हावे असे म्हटले आहे. शिक्षकांच्या अशा देण्याने विद्यार्थ्यांच्यात निश्चितच चांगले संस्कार होतात. विज्ञान कितीही प्रगत झाले आणि त्याने शिक्षण देणारी आधुनिक अद्ययावत कितीही साधने निर्माण केली असली तरी शिक्षकाला पर्याय नाही, असे सांगून जगविख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी त्यांच्या शाळेतील भावे मास्तरांच्या प्रेरणेने आपण शास्त्रज्ञ होण्याचे ठरविले असा कृतज्ञतापूर्वक उल्लेख आपल्या शिक्षकांविषयी व्यक्त केला आहे. शिक्षकाच्या प्रेरणादायी शिकविण्यानेच विद्यार्थ्याच्या जगण्याला एक चांगला आकार प्राप्त होतो. त्यातून व्यक्तीचा वैयक्तिक विकास तर होतोच, पण त्याद्वारेच समाज तसेच राष्ट्र

समृद्ध होत असते. म्हणूनच विद्यार्थ्यांच्या जडण–घडणीत ध्येयवादी–निष्ठावान–चारित्र्यवान शिक्षकांचे महत्त्व मोठे आहे. छत्रपती शाहू महाराजांनी शाळेची इमारत थोडी अशी–तशी असली तरी चालेल, पण उत्तम नागरिक निर्माण करणारा शिक्षक अर्धा–कच्चा असून कसे चालेल असा प्रश्न केला आहे. माजी शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांनी शिक्षक हा केवळ अध्यापन करणारा मास्तर नाही, तो स्वयंप्रकाशी ऊर्जास्त्रोत आहे. असा शिक्षकांचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. अमेरिकेतल्या एका शिक्षक संघाचे ब्रीदवाक्य साऱ्या शिक्षक संघांनी, शिक्षण संस्थांनी आणि शिक्षकांनीही सदैव स्मरणात ठेवावे असे आहे ते म्हणजे,

'Every teacher may not be worth two thousand dollers but every child is worth a two thousand dollers teacher.'

आपल्यालाही असेच 'Man making, character building education' देणारे शिक्षक हवे आहेत. यालाच महात्मा गांधींनी 'जीवन शिक्षण' म्हटले आहे. त्यासाठी विनोबांच्या भूमिकेनुसार, शिक्षकाने आचार्य म्हणजे, सदाचरण असणारा असे असले पाहिजे. त्याशिवाय मुलांवरच काय पण समाजावरही सुसंस्कार कसे होतील? शिक्षकाच्या आचरणात ज्ञाननिष्ठा, समाजनिष्ठा आणि विद्यार्थिनिष्ठा असली पाहिजे याचा ते आग्रह धरतात; तो यासाठी, की स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे 'सर्व शिक्षणाचे हेतू माणसाचे व्यक्तिमत्त्व घडविणे' असून महात्मा गांधीजींनी म्हटल्यानुसार 'शाळांना जीवन शिक्षा मंदिरा'चे रूप प्राप्त झाले पाहिजे.

माणूस घडविण्याच्या दृष्टीने शाळा–महाविद्यालया–तील ग्रंथालय या घटकाचेही मोल निर्विवाद म्हणावे लागेल. मानवी मनाचा विस्तार, त्याचा सर्वांगीण विकास हा वाचनानेही होतो याच जाणिवेने पूर्वी नालंदा महाविद्यालयात मुख्याध्यापकांची अशी आज्ञा असे की विद्यालयात मोठा ग्रंथसंग्रह असून विद्यार्थ्यांनी वाचनासाठी त्याचा उपयोग केलाच पाहिजे. शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी 'रिकामा जाऊ न दे क्षण' या वचनानुसार अखंड वाचनाचा व्यासंग करीत असतात. त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व ज्ञानसंपन्न होते. एवढेच नव्हे तर, मौलिक ग्रंथ सिद्ध करून, व्याख्याने देऊन अध्यापनाचे कार्य करीत असताना विद्यार्थ्यांचे ते प्रेरक प्रबोधन करीत असतात. शिक्षण आणि वाचन या दोन गोष्टी एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्यातून विद्यार्थीच नव्हे तर अखिल समाज सद्विचारी आणि सर्वगुणसंपन्न होत असतो.

शिक्षणाच्या प्रक्रियेत भाषेचा मुद्दाही डोळ्याआड करून चालत नाही. माणसाच्या अंतर्मनापर्यंत कोणती भाषा पोहोचू शकते? अर्थात ती मातृभाषाच. विशेषत: ज्ञान बहुजनांपर्यंत पोहोचावे म्हणूनच तर संत ज्ञानेश्वर, महात्मा चक्रधर या संतांनी सातशे–आठशे वर्षांपूर्वी संस्कृत भाषेतील तत्त्वज्ञान मराठीत आणले. त्यांचा दृष्टिकोन लक्षात घेतला पाहिजे. आधुनिक विचारवंतांनीही किमान प्राथमिक शिक्षण मराठीतून दिले गेले पाहिजे हा विचार पदोपदी मांडला. याच दृष्टीने डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकरांनी महाराष्ट्र ज्ञानकोशाचे २३–२४ खंड मातृभाषा मराठीतूनच सिद्ध केले. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनीही मातृभाषेचाच आग्रह धरला. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कवी कुसुमाग्रज यांनी त्यांच्या कवितेत म्हटले आहे –

*परभाषेतही व्हा पारंगत, ज्ञान साधना करा तरी*
*माय मराठी मरते इकडे, परकीचे पद चेपू नका*
*भाषा मरता देशही मरतो, संस्कृतीचाही दिवा विझे*
*गुलाम भाषिक होऊन आपल्या प्रगतीचे शिर कापू नका*

मातृभाषेकडे दुर्लक्ष केल्याने आपल्या संस्कृतीचाही विलय होऊ शकतो. ही धोक्याची जाणीव कुसुमाग्रजांनी

व्यक्त केली आहे म्हणूनच शिक्षणासाठी मातृभाषेचे महत्त्व आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

भारतीय ऋषीमुनींनी, संत महंतांनी चांगले विचार, चांगली तत्त्वे सांगून ठेवली आहेत. त्यातील सार्वकालिक अशी महत्त्वाची संस्कारक्षम जीवनमूल्ये नव्याने समाजात प्रसृत केली पाहिजेत. हे कार्य संतांच्या कार्याप्रमाणे निरपेक्षपणे केले पाहिजे. विशेष महत्त्वाची बाब म्हणजे शिक्षणातील ज्ञानार्जनाचे दर्शन व्यक्तीच्या आचरणात दिसले पाहिजे. तसेच ते सामाजिक जीवनातही दिसले पाहिजे. मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात इंग्रज राजवटीतील त्या वेळचे गव्हर्नर फ्रियर यांनी विद्यार्थ्यांना आव्हान केले होते, तुमच्यावर केवळ विद्यापीठाची कीर्ती अवलंबून नाही, समाजाची नीती तुमच्यावर अवलंबून आहे. तुमच्या वर्तनात सगळ्या सशिक्षित जगाचे गुण दिसायला पाहिजे या विधानातून नीतियुक्त सुशिक्षित वर्तनाची आवश्यकता सांगितल्याचे दिसून येते.

काळानुसार मानवी जीवनाच्या कक्षा रुंदावत गेल्या, विज्ञान शिक्षणाने फार मोठी क्रांती, परिवर्तन केले असून दिवसेंदिवस औद्योगिक क्षेत्रातील विकासही वेगाने होत आहे. विज्ञान तंत्रज्ञानात प्रगती करणे, कौशल्य आत्मसात करणे हे अनिवार्य आहेच, पण त्याचबरोबर मूल्याधिष्ठित जीवनाचा विचारही करावा लागतो. यासाठी डॉ. माशेलकर यांनी पाच कलमे सांगितली आहेत : १. विद्यार्थिकेंद्री शिक्षण २. स्त्रीकेंद्री कुटुंब ३. मानवकेंद्री विकास ४. ज्ञानकेंद्री समाज आणि ५. नवनिर्माणकेंद्री भारत. हे कार्य केवळ शिक्षकच करू शकतो असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. गोवारीकर यांनी काळाच्या गरजेनुसार विद्यापीठांनी बदलण्याची आवश्यकता सांगितली. प्रचंड प्रमाणावर होणाऱ्या ज्ञानाच्या वाढीचा वेग लक्षात घेता, औद्योगिक क्षेत्रातील व्यवस्थापन, अभियंते, तंत्रज्ञ, लेखापाल आणि इतर कर्मचारी यांना विशिष्ट साच्याचे शिक्षण न देता तो साचा 'कैफेटरिया' पद्धतीचा असणे गरजेचे आहे, असे म्हटले आहे. शिक्षणाच्या केंद्रस्थानी केवळ 'अध्यापन' न राहता 'अभ्यास' राहावा. ज्ञान मिळविण्यासोबत कौशल्य शिकणे महत्त्वाचे मानावे. शिक्षण क्षेत्रास व्यावसायिक दृष्टीने पाहू नये इत्यादी अनेक मूलगामी विचार मांडले आहेत. भारतीय दूरसंचार क्रांतीचे प्रणेते श्याम पित्रोदा यांनी ज्ञानोन्मुखता विकसित करण्यासाठी ग्रंथालये, संवाद, संपर्क यंत्रणा आणि सकारात्मक कृती प्रकल्प यांना नवी शक्ती देण्यावर भर दिला आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण, मुक्त अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन सर्वंकष नवतेचा ध्यास घेणारे सर्वस्पर्शी शिक्षण हा विचार डोळ्यांपुढे ठेवून सुधारणा घडवून आणणारे शैक्षणिक नेतृत्व निर्माण करणे हे 'राष्ट्रीय ज्ञानयोगाचे' उद्दिष्ट असल्याचे सांगितले आहे. असे नेतृत्व शिक्षण स्तरावरूनच येऊ शकते असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. ई-शासन (E-Governance) उभारून कारभारातील पारदर्शीपणा आणि जबाबदारीतील बांधिलकी याचा दर्जात्मक स्तर विकसित करावा हाही नवा विचार शिक्षणात येत असल्याचे सांगितले आहे. त्यासाठी या देशात विद्यापीठातील विविध ज्ञानशाखांमधली प्रवेश संख्या किमान चार पटींनी वाढविली पाहिजे आणि तेवढ्याच पटीत गुणवत्तेकडेही लक्ष दिले पाहिजे असेही त्यांनी सांगितले आहे.

श्याम पित्रोदा यांनी त्यासाठी उपायही सुचविले आहेत. त्यात विद्यापीठांची स्वायत्तता, राष्ट्रीय विद्यापीठांची स्थापना, त्या ठिकाणी अखंड संशोधन कार्य होणे, विद्यार्थ्यांना विविध शाखांमध्ये एकीकडून-

दुसरीकडे संचार करता येणे, त्यांनी बहुशाखीय ज्ञानदृष्टीची निवड करणे, वर्षभर वर्गात उपस्थित राहणे, शिक्षकांनी वर्षभर मूल्यांकन करणे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या कार्यासाठीही त्यांनी शिक्षकांप्रती विश्वास व्यक्त करून सर्वोत्तम दर्जाचे शिक्षक, संख्येनेही अधिक उपलब्ध करून, ठरावीक काळाने शिक्षक मूल्यांकनावरही त्यांनी भर दिला आहे.

विज्ञान युगाने मानवासमोर अनेक प्रश्न निर्माण केले आहेत, त्याला उंच विहार करायला पंख दिले, त्याला व्यापक अशा दूरदृष्टीचे बळ दिले, त्याचा जीवन व्यवहारही सुकर केला, असे असले तरी ज्ञानाचा स्फोट, गतिमान जीवन पद्धती, दळणवळणाची गतिमान साधने, तंत्रज्ञानाचा विकास, निसर्गसंपत्तीचा वारेमाप वापर, वाढती यंत्रसंस्कृती या वैशिष्ट्यांना पेलण्याची शक्ती मानवात निर्माण होण्याची गरज आहे. भारताची जीवनप्रणाली लोकशाहीची असून, लोकशाहीचा आत्मा समतेचा विचार हा आहे. यासाठी विज्ञान तंत्रज्ञानयुक्त भौतिक समृद्ध जीवन जगताना समता, सर्वधर्मसमभाव या भावना तरुण पिढीच्या मनात शिक्षणाद्वारे रुजवाव्या लागतील. त्यासाठीच संस्कारयुक्त शिक्षणाची नितांत गरज आहे आणि ती गरज शिक्षणच भागवू शकेल. त्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन अविरतपणे, अथकपणे, दुर्दम्य उत्साहाने कार्य करण्याची गरज आहे.

■■■

**(पृष्ठ क्र. १६ वरून)**

परीक्षेला बसली होती आणि सगळीच्या सगळी नापास झाली होती. नापासांपैकी सगळ्यात जास्त गुण मलाच होते म्हणून मी शाळेत पहिला आलो होतो. महाविद्यालयात असताना मला जेमतेम सेकंड क्लास म्हणजे केवळ पंचेचाळीस टक्के गुण होते. तरीही मी महाविद्यालयात पहिला होतो आणि पुढील शिक्षणासाठी विद्यापीठात गेलो तेथे आमच्या संपूर्ण मराठवाड्यात आठही जिल्ह्यातून मी पहिला आलो होतो. मला वा. गा. मायदेव, अण्णाभाऊ साठे आणि वा. ल. कुलकर्णी यांच्या नावांनी ठेवलेली तीन सुवर्ण पदके मिळाली होती.

जे केले ते उत्कृष्ट करण्याचा आणि जेथे गेलो तेथे पहिला येण्याचा मान मी नेहमीच मिळविला आहे. मी खेड्यात जन्मलो, माझ्या भोवतीचे वातावरण चांगले नव्हते, अशी तक्रार मी कधीही केली नाही; किंबहुना आहे त्या वातावरणातील सगळे चांगले घेत आणि वाईट नाकारत मी पुढे पुढेच जात राहिलो. परिस्थितीशी झुंजत राहिलो. त्या झुंजीत यशस्वी होत गेलो आणि आज माझ्या आयुष्यात सर्वत्र यश भरून राहिलेले आहे. यशाची खात्री नव्हती पण झुंजीचा आनंद होता. तो आनंद मी मनमुराद लुटला. यश आपोआप पाठीमागं धावत आलं.

■■■

# वेध भविष्यातील शिक्षणाचा...

**रेणू दांडेकर**
भ्रमणध्वनी : ९४२०१५७७६५

> *शाळेत मुले फक्त पुस्तकी ज्ञान मिळवीत नाहीत. शाळेत ती बालवयस्कांच्या समाजात असतात. त्यांच्याबरोबर अनेक गोष्टी शिकतात. आपल्याच वयाच्या मुलांकडून त्यांना भावनिक आधार मिळतो. कोरोनाच्या काळात यापासून ती वंचित आहेत. ऑनलाईन शिकणे सुरू असले तरी शहरी-ग्रामीण, विद्यार्थी, पालकांची विषम परिस्थिती, सुविधांची कमी-जास्त उपलब्धता या सगळ्यांना तोंड देण्यासाठी कशाकशाचा विचार करायला हवा. याविषयी...*

काही अनुभव शिक्षक आणि पालक यांच्या घरातल्या काही अनुभवांवरून मनात आकारास आली एक रचना. तुम्हीही या अनुभवात सहभागी व्हावे म्हणून हे लिखाण. सध्याच्या ऑनलाईनच्या काळात सगळे वेबिनार होतील त्याला शब्दनार म्हणू या. सध्या तुम्ही, मी आणि आपण सगळेच एका वेगळ्या मानसिकतेतून आणि फेजमधून जात आहोत. इतके दिवस परिणाम झाले, पण जाणवले नाहीत आणि जाणवलेले आपण मनात कोंडून ठेवले. हो ना! घरात चिडचिड, टी.व्ही. बघायचा कंटाळा, मोबाईलचे बोअर होणे... असे का झाले? एक कल्पना न केलेले रिकामपण, आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात आलेली एक कल्पना न केलेली अनिश्चितता जगण्याला व्यापून राहिली आहे. हे सगळे क्षणभराचे असते तर ठीक होते, पण महिना, दोन महिने, चार महिने, सहा महिने गेले. पुढचेही काही माहीत नाही.

एका पालकांच्या घरी गेले होते. ठिकाण शहर, आर्थिक स्तर मध्यमवर्गच, पण उच्चतेकडे झुकलेला. दोघांचे काम मात्र लॅपटॉप, कॉम्प्युटरवरचे होते. पद होते अधिकाराचे, टू बाय टूची फॅमिली. दोन मुले, त्यांचेही ऑनलाईनच शिक्षण सुरू होते. जास्तीत जास्त शिकणे व्हावे, वर्ष वाया जाऊ नये यासाठी आई-बाबांची धडपड सुरू होती. येता-जाता 'अभ्यासाला बस' असा मागे तगादा लावलेला. या सगळ्यांनी व्यापलेली अस्वस्थता, काय करावे हे न उमजणे, घरात बसून आलेला कंटाळा आणि सगळ्यांत महत्वाचे म्हणजे इतका वेळ एकत्र न राहण्याची सवय. 'चला कोरोनाचा फायदा झाला. रजा काढून घरात बसायला मिळाले.' मी मूड चेंज करावा म्हणून म्हणाले, ''खरं सांगू खूप प्रश्न वाढलेत. तो त्याच्या कामात, मी माझ्या. काय बोलायचे?'' ती म्हणाली, ''ऑफिसमध्ये बोलताच ना! काम करताना! तसे बोलायचे!'' ''मुलांकडे लक्ष कोणी द्यायचे! कोणी कंट्रोल करायचा. कोणाबरोबर शेअर करायचे...!'' तो सांगू लागला, मग मात्र मी विचार करू लागले आणि थोडा वेळ (चहा येईपर्यंत) गप्प बसले. ज्या गोष्टी लक्षात आल्या त्या तुमच्या बरोबर शेअर करते आणि त्यांच्याबरोबरही केल्या.

येथे काय झाले? बाहेर तुम्ही अधिकारी असता. कोणी तरी तुमचे ऐकते, तुम्हांला फॉलो करते. सगळे

तुमचे कौतुक करतात, पण जेव्हा तुम्ही एकदम खालच्या पदावर असता तेव्हा क्रमाक्रमाने वरच्या पदावरील व्यक्तींना टाळण्यात, बाजूला करण्यात वेळ जातो. बरं, हे सगळे अशा माणसांच्यात असते ज्यांच्याशी आपले व्यावहारिक नाते नसते, कौटुंबिक नाते नसते. नाही संवाद झाला तर गॉसिप, संवाद नाही झाला तर मनाचा आधार, आपला एक इगो आपोआप विकसित होतो. मी, माझे अस्तित्व, माझी इतरांना हाताळण्याची हातोटी... यात मी दंग असतो. कोणी स्तुती केली की आवडते. कोणी टोचून बोलले की झेलावे लागते. वेळ संपली की दमूनभागून घर गाठतो.

सध्याच्या काळात घरात हा 'इगो' सांभाळला जात नाही. उलट 'मी काम करतो, मी ही काम करते' यात टकराटकरी होते नि अशी एकत्र वावरायची सवयही नसते. उलट बाहेरच वेळ चांगला जातो. शिवाय कोणीच कोणाजवळ इतका वेळ राहत नाही.

तेव्हा हे समजून घेऊ आणि ज्याबद्दल मतभेद आहेत, दुरावा आहे, चिडचिड होते त्या कारणांच्या मुळाशी जाऊन लक्षात येते, की कितीतरी कारणे मला वाटते म्हणून तशी आहेत. आम्ही कधी आमच्या व्यवसायात एकमेकांना समजूनच घेतले नाही. सगळ्यांच्या समोर घडणाऱ्या घटनांकडे मी मोठ्या विचारातून बघते आणि तशीच प्रतिक्रिया देते, जी समोरच्याला दुखावते. यातून बाहेर पडावे लागेल, नाहीतर मनाच्या आरोग्याचा प्रश्न अधिकच गंभीर होत जाईल. आजकाल तर अशी स्थिती आहे बऱ्याच घरांशी रात्रीचा निवारा, रात्रीचे जेवण, एवढेच नाते टिकून आहेत. तेथील प्रश्न गंभीर आहे. याचा पहिला टप्पा आहे एकमेकांनी आपल्या कामाचे, विचारांचे, भविष्याचे, अपेक्षांचे शेअरिंग करायचे.

ग्रामीण भागातील समस्या आणखी वेगळ्या आहेत. ग्रामीण भागातील जे लोक नोकरीसाठी शहरात आहेत त्यांच्या विवंचना वेगळ्या आहेत. परिणाम कसे होत आहेत हे बघणे आणि त्यावर काम करणे पर्यायाने Mental Empowerment हे काम सुरू करावे लागणार आहे. मी अगदी लहान गावात राहते. केवळ ८०० वस्तींचे हे छोटेसे गाव. आमच्याकडे एक गडी आहे. त्याची वहिनी-भाऊ मुंबईहून शिमग्याला आले ते कोरोनामुळे गावातच राहिले. वहिनी मुंबईतच असते. तिचे राहणीमान या गड्याच्या बायकोने पाहिले आणि म्हणाली 'मी कशाला काम करू? मुंबईत रहा. एवढ्याशा खोलीत काय काम? तुम्ही मुंबईला जाणार नसलात तर मी नाही राहणार, तुमच्याबरोबर... काम नाही करणार घरातलं...' दिसायला हे बोलणे साधे वा हास्यास्पद वाटेल, पण या अशा अनेक छोट्या छोट्या गोष्टींपासून ते मोठ्या गोष्टींपर्यंतचे परिणाम आपल्याला दिसणार आहेत. घरातील गोष्टींचा प्रभाव लहान मुलांवर पडणारच.

पुन्हा मी विचार करू लागले, मुले शाळेत म्हणजे बालवयस्कांच्या समाजात असतात. यात मुले अनेक गोष्टी शिकतात. मुख्य म्हणजे त्यांना जाणून घेणारा भावनिक आधार त्यांना आपल्याच वयाच्या मुलांच्यात मिळतो म्हणून एक वेळ School without teacher असू शकेल, पण School with students/children असेच असणार. नव्हे तर School is equal to children शाळा म्हणजे मुले असे आहे. हा भावनिक स्पर्श त्यांना मिळेल अशी रचना या महासंकटात गरजेची आहे. हा Social Schooling चा स्पर्श ऑनलाईनमधून मिळणार नाही. कदाचित अभ्यास हा प्रश्न काहीसा मिटेल. मला वाटते तो सोडवायचा प्रयत्न मी केला. 'विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी चालविलेली शाळा म्हणजेच बालशिक्षकांची बालशाळा' त्यामुळे जवळ जवळ गेले दोन महिने मुले शाळेत आहेत. त्यांच्याच वाडीत! वाडीतल्या मंदिरात! मास्क बांधून, अंतर ठेवून! पालकांनी आपली चिंता व्यक्त केली

होती. 'शिकवलंच न्हाय तर लिव्हनार काय?' 'मुलं गाईडं मागतायत लिव्हायला,' हा प्रश्न मिटला. मुलांचा कमी Screen time झाला. मोबाईल हातातून ४ तास लांब गेला. माझी खात्री आहे अजूनही हा प्रयोग कोठेही अवलंबिला जाईल. अर्थात हे आधी घडायला हवे होते. विशेषतः आपण एकाच उत्तराचा शोध घेतला आहे तो ऑनलाईन. त्यातील कमतरता, अडचणी कळत होत्या पण मार्ग शोधायला मन घाबरत होते.

पालक शिक्षित आहेत त्यांचे प्रश्नही वेगळे. जे पालक गरीब त्यांची चिंता वेगळी. ज्यांच्या मुलांना वेब लर्निंग येत होते त्यांना सक्तीने ही संधी द्यायला त्यांचे पालक उत्साही होते. जरी हा काळ संपला तरी झालेल्या परिणामावर निदान शिक्षकांना तरी काम करावे लागेल. जोपर्यंत पहिल्यासारखा पैसा हातात येणार नाही अशा सामान्य नोकरी करणाऱ्या पालकांच्या मुलांना आपल्यालाच सावरावे लागेल. आज मुलांवर झालेले परिणाम पुन्हा पुसून काढावे लागतील, ते असे जाणवतात.

१) मुले Screen addict झाली आहेत.

२) मुले आक्रमक, हट्टी आणि आग्रही झाली आहेत.

३) भकास रिकामपणामुळे अस्वस्थ, चंचल झाली आहेत.

४) मुलांचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे.

५) बाहेर कुठे जात-येत नाही. त्यामुळे आलेल्या बंधनांमुळे मुले भयग्रस्त आणि कावरीबावरी झाली आहेत. वेळ घालविणे हा भाग सरावाचा झाला आहे.

६) अभ्यास परीक्षा, खेळ  इतर कार्यक्रम इत्यादी गोष्टींमुळे शाळेत जाणारा मुलांचा वेळ या लॉकडाऊनमुळे मुलांना घरात बांधून ठेवल्यासारखे झाल्याने काय करावे हे त्यांना समजत नाही.

पुन्हा जेव्हा शाळा सुरू होतील तेव्हा शिक्षकांची गडबड होईल, त्यांच्यावर दडपण येईल. अभ्यास, पाठ्यपुस्तक कसे संपवायचे, कसे पूर्ण करायचे याची चिंता. पालकही चिंतेत अभ्यासच पूर्ण झाला नाही तर! आणि हे सगळे पुढे कसे न्यायचे? नाही म्हटले तरी शिक्षकांपुढे हा प्रश्नच आहे कारण मुलांचा बौद्धिक दर्जा खाली आला तर सजग पालकांना तोंड द्यावे लागणार आहे. यासाठी अभ्यासपूरक, अभ्यासेतर आणि सहशालेय उपक्रमांचा, कृतिपत्रिकांचा, कार्यक्रम-प्रकल्पांचा विचार करणे महत्त्वाचे ठरेल.

नुकतीच एका शिक्षकांच्या घरी गेले होते. त्यांची अशी अडचण झाली की दिवसभर बोलण्याचे काम करणाऱ्या शिक्षकांना घरीही बोलत रहायचा मोह होत होता. बाहेर मुलांना हे बोलणे ऐकण्याशिवाय पर्याय नसतोच. घरी काय करणार? वहिनी म्हणाल्या ''दिवसभर बोलत असतात. पोरांपुढे बोलायची सवय लागलेली आणि गप्प बसा म्हणायची सवय लागलेली. घर कसे गप्प बसेल.'' वहिनींनी जरी विनोद केला असला तरी हे वास्तव आहे आणि हे अनुभव आपल्याला समजून सांगतात की मुलांसमोर बोलण्याने आपण किती भारदस्त बोलतो. वर्ग कसा गप्प गप्प असतो ही भावना वाढीस लागलेली असते. हा एक प्रकारे आपल्यातील इगोच आहे आणि आपापल्या ठिकाणी आपण तो जपत असतो.

शिक्षक म्हणून आपल्याला वर्गावर न जाता शांत रहावे लागते आहे. एका अर्थाने आपल्या इगोला कोरोनामुळेच ठेच लागली. आपण सैरभैर झालेले असतानाच ऑनलाईनचा दबाव आला. आजूबाजूला अशा घटना घडत गेल्या की, आपण या कोरोना नावाच्या अधिकाऱ्यामुळे घाबरलो. मुलांना बोलवायचे नि काही झाले तर यायचे आपल्याच अंगाशी! या विचाराने त्या फंदात पडलो नाही. खरं तर आपण सगळेच where the mind is only with fear असे वावरतो. त्यामुळे आपली कल्पकताच थांबली. आपापली शाळा

नि अवतीभोवतीचा परिसर याचा आपल्यापुरता विचार करून काही मार्ग काढता आला नसता का?.. कदाचित हे शक्य होते पण कोणी काही विचारले तर, कोणाला उत्तर द्यायची वेळ आली तर ! नकोच त्यापेक्षा असे म्हणून आपण बाजूला झालो. असे नको होते व्हायला.

जी काही शिक्षणाची गाडी यंत्रणेकडून सुरू झाली तिला असे थांबायची, एवढा वेळ थांबायची वेळ पहिल्यांदाच आली. प्रवासाला उशीर झाला. जेथे पोहोचायचे तेथे उशीर होणार आहे. याच वेळी नवीन शैक्षणिक धोरणही आले आहे म्हणून आपले लक्ष कदाचित थोडे विचलित झाले असेल, याचे परिणाम...

१) शाळेत येण्याचे मुलांचे प्रमाण कमी होईल/घटेल.

२) शाळाबाह्य मुलांची संख्या वाढेल.

३) आर्थिक फटका बसल्याने पालक पाठबळ देण्यास कदाचित तयार होणार नाहीत.

४) घरातील प्रश्न असे असतील जे शाळेत येणाऱ्या मुलांवर परिणाम करतील.

५) पालक आणि समाज मुलांना शाळेत पाठवायला घाबरतील कदाचित पुन्हा खंड पडेल.

६) काही विषय (गणित, विज्ञान) काही भाग वगळून/सोडून देऊन शिकवून चालणार नाही. त्यांच्या अध्यापन नियोजनाचा प्रश्न असेल.

७) सर्व प्रकारची काळजी सर्वजण घेतीलच असे नाही. त्यामुळे अनेक पातळ्यांवर लढावे लागेल.

८) इतके दिवस डॉक्टर्स, नर्सेस, पोलीस योद्धा म्हणून काम करीत होते. आता ती आपली नैतिक जबाबदारी असेल.

९) प्रत्येक मुलाच्या घराशी संपर्क करावा लागेल आणि आपल्याला समुपदेशनाचे कामही करावे लागेल.

थोडक्यात, आपण मानले तर आपली जबाबदारी वाढणार आहे. आत्ताच प्रश्नांचा शोध घ्यायची संधी आहे. उत्तराची चाचपणी करावी लागणार आहे. अध्यापनाच्या पद्धती बदलाव्या लागतील. शाळा सुरू होणार म्हणून आनंदाने मुले शाळेत धावत येतील. तो आनंद तसाच राहील आणि त्यामुळे घरातील सर्वचजण त्या आनंदात असतील, हाच विचार करू या!

## वर्गणीदारांसाठी सूचना

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/– (रुपये तीनशे फक्त) आहे. आपली वर्गणी **'संपादक, जीवन शिक्षण, पुणे ३०'** या नावे **'स्टेट बँक ऑफ इंडिया'**च्या कोणत्याही शाखेत बचत खाते क्र. **11153675105** मध्ये भरावी. बँकेत पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, स्वत:चा पूर्ण पत्ता, (पिनकोड द्यावा.) मोबाईल नंबर व ई–मेल आयडीसह पोस्टाने अथवा ई–मेलने jeevanshikshan@maa.ac.in वर पाठवावी. 'जीवन शिक्षण'ची वार्षिक वर्गणी अथवा पुस्तके मागणीसाठीचे पैसे मनीऑर्डरनेही स्वीकारले जातील.

# ‘चकली चुकली नि अनारसा रुसला तर फराळच फसला...’

**आनंद घैसास**
वैज्ञानिक अधिकारी,
होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, मुंबई.
भ्रमणध्वनी : ९८६७२१९४५५

लहानपणी आम्ही दिवाळीची आतुरतेने वाट पहायचो. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे रोजच्या पोळी–भाजी–आमटीपासून सुटका मिळे ती दिवाळीतल्या फराळामुळे. चकली, करंजी, चिवडा आणि लाडू हे दिवाळीचे मुख्य पदार्थ. त्यांच्या जोडीला असायचे, चिरोटे, शंकरपाळी, कडबोळी, साटोऱ्या, शेव आणि अनारसे. दिवाळीतील लाडू म्हणजे रव्याचे, ओला नारळ घातलेले; नाहीतर बेसनाचे. चिवड्याचेही दोन–तीन प्रकार–एक तळलेल्या पोह्यांचा, एक भाजलेल्या जाड पोह्यांचा तर आणखी एक पातळ पोह्यांचा. शंकरपाळीसुद्धा दोन प्रकारची, एक गोड तर एक खारी. शेवही एक बारीक, पातळ, पिवळ्या रंगाची खुसखुशीत, तर दुसरी थोडी जाड, लाल, लांबुडक्या काड्यांसारखी, तिखट आणि थोडी कडकही. ती खाताना ठसका लागलाच पाहिजे!

> *दिवाळी उत्साहाचा, आनंदाचा सण. दिवाळीचा फराळ म्हणजे पर्वणी. दर दिवाळीला होणाऱ्या फराळाच्या ठरावीक पदार्थांचा कधी कंटाळा येत नाही, कारण त्यांचा खमंगपणा यात चकलीचा नंबर पहिला. चकली, अनारसे हे पदार्थ सुगरणीची कसोटी पाहणारे. त्यांच्या कृतीबरोबरच त्यामागचे विज्ञान उलगडून दाखविले आहे. स्वयंपाकघरातील या विज्ञानाविषयी....*

फराळाचे हे पदार्थ ज्या कोणी शोधून काढले असतील त्यांचेही खूप कौतुक वाटायचे. कसे काय बुवा त्यांच्या मनात आले असेल की, असे पदार्थ केले की, ते झकास होतील? हे पदार्थ करतानाही खास कसब वापरण्याची आवश्यकता लागते, चक्क विज्ञानच वापरून प्रत्येक रीत ठरली गेली आहे, हे आता समजतंय.

चकलीचे पीठ, ज्याला भाजणी म्हणतात, ते तयार करण्यात जसे कौशल्य आहे, त्याप्रमाणेच ते मळून, तळण्यातही. ‘सर्वच गोष्टी कशा जमून यायला लागतात’ हे माझ्या आजीचे ब्रीद वाक्य असे. हे जमून येणं म्हणजे काय तेच पाहू या.

फराळाचे पदार्थ बनविताना त्यातील प्रत्येक छोट्या छोट्या कृतीला फार महत्त्व असते, शिवाय ‘पेशन्सही’ लागतो. चकलीची भाजणी करताना प्रत्येक गोष्ट नीट भाजली गेली नाही, तर शेवटी चकली चिवट, मऊ बनते. जास्त भाजल्या गेलेल्या डाळींमुळे तर चकली एवढी ठिसूळ बनते की, तळतानाच तिचे तुकडे पडतात, शिवाय कधी कडवट चव येते, तर कधी करपट वास येत राहतो. भाजणीचे प्रमाणही फार महत्त्वाचे असते. जेवढे तांदूळ, त्याच्या निम्मी चण्याची डाळ. जेवढी चणा डाळ, त्याच्या निम्मी उडदाची डाळ. थोडे धने आणि जिरे हे चवीसाठी. हे सारे वेगवेगळे भाजून घ्यायचे, मग एकत्र करून दळले की, झाली चकलीची भाजणी.

पाहा हं, डाळींमध्ये एक अंगभूत चिकटपणा असतो. तांदळामध्ये, उडदामध्ये असणाऱ्या या चिकट डिंकासारख्या पदार्थाला ‘रेझिन’ म्हणतात. तांदूळ अर्धे कच्चे शिजविले तर त्याचा आपण चक्क ‘खळ’ म्हणून

उपयोग करू शकतो. पतंग करताना किंवा आकाशकंदील करताना त्याचे पातळ कागद चिकटविण्यासाठी आम्ही लहानपणी तांदळाचे पीठ शिजवून खळ करीत होतो, डिंकासारखी वापरायला. शिवाय तांदूळ, डाळींमध्ये पिष्टमय (कार्बोहायड्रेट) पदार्थांचे प्रमाणही बरेच असते. नुसत्या उडदाच्या डाळीचे पीठ थोडे पाणी घालून कालवून पाहा. किती चिकट होते त्याची लाटी. चणा डाळीचे पीठ तर आपण अंघोळीच्या वेळी अंगाला लावण्यासाठी, कातडीचा तेलकटपणा काढण्यासाठी वापरतो. त्याचे कारण, चण्याचा तेल शोषून घेण्याचा गुणधर्म. तर या भाजणीतला हा चिकटपणा संतुलित राखणे महत्त्वाचे. डाळी आणि तांदूळ भाजल्यामुळे हा जास्तीचा चिकटपणा कमी होतो.

पाण्याचे प्रमाणही किती आणि हो, 'मोहन' किती आणि ते केव्हा आणि कसे घालायचे, तेही तेवढेच महत्त्वाचे. 'मोहन' म्हणजे पीठ भिजविताना गरम करून त्यात घालायचे तेल. हे गरम तेल चकलीला आतून शिजविण्याच्या कामी जणू फितूर जसे युद्धात आतून मदत करतात, तसे साहाय्य करते.

चकलीचे पीठ भिजविताना, ते सरळ पाणी घालून भिजविले की झाले, असे होत नाही. तर एका परातीत भाजणी घेऊन त्यावर आधी थोडे तेल गरम करून घालतात. पंधरा वीस मिनिटं ते मुरू देतात. त्यानंतर पाणीही गरम करून भाजणीवर चक्क शिंपडतात. ओतत नाहीत. पाणी शिंपडत असतानाच, हळुवार हाताने, (आजीचा हात ज्याच्या डोक्यावरून, पाठीवरून फिरला असेल, त्यालाच कळेल हळुवारपणा काय असतो ते) मळतात. असे केल्यावर भाजणीत छोटे छोटे गोळे तयार व्हायला लागतात. एकच मोठा गोळा होईल एवढे पाणी घालून आधी मळत नाहीत, तर ही अशी भुसभुशीत गुठळ्या असलेली भाजणी त्यावर थोडे वजन ठेवून (लाकडाचा वजनदार पोळपाट उलटा करून त्यावर ठेवून देण्याची माझ्या आजीची पद्धत होती) देतात. हा जो काही 'मुरू' देण्याचा वेळ असतो, तो फार महत्त्वाचा. याने काय होते की तेल, पाणी, डाळी आणि तांदुळातील प्रथिने आणि 'रेझिन' यांच्यामध्ये अंतर्गत (आतल्याआत, न दिसणारे) रेणवीय बंध निर्माण होतात. या क्रियेला 'इमल्सिफिकेशन' म्हणतात. त्यामुळे पिठातील सारे पदार्थ जणू लांब लांब साखळ्यांसारख्या रेणूंच्या माळेने सांधले जातात. हे पीठ चांगलं ३/४ तासांनंतर पुन्हा त्यात थोडं पाणी घालून त्याचा एकसंध गोळा होईपर्यंत मळतात. त्यासाठी साधंच पाणी वापरतात. मळताना आधी हाताला 'तेलाचे बोट' लावायचे मात्र विसरायचे नाही. हाताला पीठ चिकटता कामा नये, पण तयार झालेला गोळा तेलकटही होता कामा नये.

हा गोळा करतानाच, त्यात योग्य प्रमाणात तिखट–मीठ घालतात. त्याचीही गंमत आहे. तिखटही चांगल्या प्रतीचे हवे. जुने नको. त्याचा चकलीच्या रंगावर परिणाम होतो आणि तेही चकली तळल्यानंतर समजते बरे का! जुन्या तिखटाने चकली काळी पडते! तसेच मीठ जास्त झाले, तरी चकलीचे तळताना तुकडे पडतात. जास्तीचे मीठ, पिठातील पाणी शोषून घेते (म्हणूनच मिठाला 'हाय ग्रोस्कोपिक' = पाणी किंवा आर्द्रता शोषून घेणारा पदार्थ असे म्हणतात) आणि पिठाला पुन्हा भुसभुशीत करते... त्याचा हा परिणाम असतो.

तेल चांगले तापल्याखेरीज चकली त्यात सोडू नये. तसे केले तर ती हळूहळू गरम झाल्याने चामट, मऊ, चिवट होते, तर कधी काळीही पडते, तेल अगदी उकळतेही असू नये, नाही तर चकली तळण्यासाठी तेलात सोडली रे सोडली की, तिचे फसफसून तुकडे पडतात. कधी भुगाच होतो. त्यामुळे मध्यम आचेवर, तेलाचे तापमान एकसारखे राहील हेही पहावे लागते. तळताना चकलीच्या बदलत्या रंगाकडेही लक्ष ठेवावे लागते. तळताना चकली जराशी लालसर दिसायला लागली, शिवाय तिचे जे जोरदार फसफसणे असते ते कमी झाले, की ती उलटावीही लागते; दोन्ही बाजूंनी

नीट एकसमान तळली जाण्यासाठी. नीट तळली गेल्यानंतर कढईच्या आतच, कडेशी झाऱ्याने धरून चकली निथळत ठेवायची. असे केल्याने ती पटकन थंड होत नाही, पण तेल मात्र निथळून जाते आणि तिच्या आत अडकलेली पाण्याची वाफही उडून जाते. त्यामुळे चकली आतून कोरडी बनायला मदत होते. चकली याच वेळी जास्त खुसखुशीत होते. बाहेरून तेलाचा चटका लागत असताना चकलीच्या आत अडकून राहिलेली पाण्याची वाफ आतून चकलीला शिजविते, त्यामुळे चकली आतून पोकळ नळीसारखी होते... आणि हीच तिची उत्तमतेची चाचणी ठरते... असो.

तळणीतून बाहेर काढल्यावरही चकल्या आधी कागदावर पसरून ठेवाव्या. वर्तमानपत्र वापरले तरी चालते. चकलीतील तेल शोषून तिला कोरडी होण्यास ते मदत करते. सगळ्या चकल्या झाल्यावर, त्या पुरेशा थंड झाल्यावर मगच डब्यात भराव्यात. चकल्या गरम असताना डब्यात भरण्याची घाई करू नये. (तसे केले तर त्या सादळतात, असे आजी म्हणायची) पुरेशा थंड झालेल्या चकल्या नीट एकावर एक रचून डब्यात भराव्यात. असे केले की, त्या जास्त दिवस टिकतातही. 'पण ही खादाड कार्टी काय जास्त दिवस टिकू देणार...' इति आजी! एकंदरीत काय की चकली खुसखशीत, चविष्ट होण्यासाठी बरीच पथ्ये सांभाळावी लागतात! कडक, तेलकट, मऊ, चिवट अशा चकल्या फराळाची गंमतच घालवतात.

आणखी एका पदार्थाची वेगळीच खासियत आहे, तो म्हणजे अनारसा. अनारसे करताना मात्र टोकाचा पेशन्स लागतो. चांगले तांदूळ, तेही तीन दिवस भिजत ठेवायचे. नंतर ते तांदूळ निथळून फडक्यावर पसरून पुरेसे कोरडे होण्याची वाट पहायची, म्हणजे त्यातही एक दिवस गेलाच समजा. पूर्ण कोरडे होण्याआधीच ते चांगले कुटायचे... यात पीठ अगदी बारीक असणे फार महत्त्वाचे. हे कुटलेले किंवा अजूनही थोडे ओलसर असलेले, जात्यावर दळलेले पीठ 'पिठीच्या चाळणीने' (जिची छिद्रे अगदी बारीक असतात) चाळून घ्यायचे. त्यानंतर जेवढे पीठ, तेवढाच गूळ आणि थोडं तूप असे एकत्र करून, पुन्हा एकजीव होईपर्यंत हे मिश्रण कुटावे लागते. (हे काम खलबत्त्यातच छान होते. मिक्सरमध्ये गुठळ्या राहण्याची शक्यता असते.) कुटल्यावर त्याचा मऊ लगदा झाला पाहिजे. हे छान मऊ झालेले पीठ एका उभट डब्यात भरून ठेवायचे. तेही डबा अर्धाच भरून. डब्याचे झाकण मात्र पक्क हवे. पाच सहा दिवस ते तसेच ठेवून द्यायचे. तांदळाच्या या ओलसर पिठात गूळही असल्याने, तांदळात आधीच असणाऱ्या सूक्ष्म जंतूंची चार–पाच दिवसांत वाढ होत जाते. पण ही वाढ त्यातील तुपामुळे संतुलित, योग्य प्रमाणात होते. त्यामुळे पीठ नासून न जाता, या सूक्ष्म जंतूंमुळे या पिठात चक्क अल्कोहोल तयार होते! (याला 'किण्वन प्रक्रिया' होणे असे म्हणतात) पिठाच्या वासातूनही हे सहज कळते. शिवाय तांदूळ आणि गुळात असणाऱ्या जीवनसत्त्वांनाही हे सूक्ष्म जंतू जवळजवळ दुप्पट करतात. साधारण पाच दिवसांनी या पिठाचा एका वेळी एका पेढ्याएवढा ऐवज घेतात. साजूक तूप लावलेल्या हाताने हळुवारपणे साखरेवर किंवा खसखशीवर, ताटलीत, पोळपाटावर किंवा एखादा प्लॅस्टिकचा कागद (दुधाच्या रिकाम्या पिशव्या यासाठी बऱ्या पडतात!) घेऊन त्यावर थापतात. अतिशय मंद आचेवर, तुपातच हे अनारसे तळावे लागतात. तळतानाही हे मात्र लक्षात ठेवायला हवे की, खसखस अथवा साखर असलेला पृष्ठभाग किंवा ती बाजू नेहमीच वरच्या दिशेला हवी. तसेच, अनारसा तळताना तो कधीही उलटायचा नाही बरं का. तर झाऱ्याने सतत त्यावर आजूबाजूचे तूप उडवीत तो तळावा लागतो! कारण अतिशय हलका असलेला हा अनारसा पटकन फाटतो! अनारसा तळताना भरपूर तूप पितो बरं का, त्यामुळे तळल्यावर एखाद्या चाळणीवर ठेवून तो चांगला निथळावा लागतो. जास्तीचे तूप बाहेर निघून जाण्यासाठी. शिवाय तळताना तो जरासा जरी

**(पृष्ठ क्र. ३४ वर)**

# 'नव्या पिढीची नवी दृष्टी'

**विश्वास सुतार**
२४०/१ ब, माजगावकर नगर,
नवीन वाशी नाका, जि. कोल्हापूर
भ्रमणध्वनी : ९४२०३५३४५२

''वर्तमान काळातले विद्यार्थी शिक्षकांपेक्षा अधिक अंकीय साक्षर (Digital Litrate) दिसून येतात. नवी पिढी तंत्रज्ञानाचा सकारात्मक वृत्तीने स्वीकार करताना दिसते. तसेच नव्या दृष्टीने या पिढीत आलेली वैचारिक प्रगल्भता मोठ्यांनाही, आश्चर्याचा धक्का देणारी आहे. दिवाळीच्या सुट्टीत कृती कार्यक्रम देऊन सुट्टीनंतर 'बाल परिसंवाद' उपक्रमाचा आपण प्रयोग करू; तर प्रत्येक शाळेत असे विद्यार्थी आपणांस भेटतील, अशी खात्री वाटते...''

> *सुट्टीत मुलांना काय काम द्यायचे, कशात रमवायचे ही पालकांपुढे असलेली नित्याची समस्या. त्यात सध्या 'ऑनलाईन' शाळा घरात सुरु; म्हणजे २४ तास मुले घरी. त्यात आवडेल अशा उपक्रमात गुंतविण्याच्या दृष्टीने 'बाल परिसंवाद' या उपक्रमाची माहिती निश्चितच उपयोगी पडावी. त्याविषयी...*

'दिवाळी' हा सण म्हणजे भारतीयांचा जिव्हाळ्याचा विषय! तसा भारतीयांना सण आणि उत्सवांचा भारी सोस. त्यातल्या त्यात दिवाळी सणाचा उत्साह तर फार मोठा. आता तर हा उत्साह केवळ भारतापुरता मर्यादित राहिलेला नाही. जगभरात अनेक ठिकाणी स्थिरावलेल्या लोकांनी दिवाळीचा प्रकाश तिथेही नेला.

नव्वदच्या दशकात भारताने 'खाउजा' धोरण स्वीकारले. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत तंत्रज्ञानाच्या साथीने जग एक खेडे झाले आहे. पृथ्वी गोल असली तरी जग सपाट होत आहे. सपाट होऊन ते एकाच मंचावर परस्पर व्यवहार करताना दिसते आहे. जगाचा पसारा अफाट असला तरी व्यवहाराचा 'मंच' मात्र तुलनेने अत्यंत छोटा, परंतु जादुई आहे. स्पर्श पटलाच्या (Touch Screen) रूपाने तो आज प्रत्येकाच्या हाती आहे. एका 'क्लिक' वर जग आपल्यासमोर दृक्-श्राव्य रूपात उभे ठाकते आहे. या माध्यमातून दिवाळी ही 'ग्लोबल' होते आहे. 'कोविड-१९' हे विषाणूजन्य महासंकट ओढवले असले तरी आरोग्यविषयक नियमांचे पालन करून आपण दिवाळीचा उत्सव आणि आनंद साजरा करूच!

मनुष्याला निसर्गतः प्रकाश, ध्वनी, गंध, रस आणि स्पर्श या गोष्टींचे आकर्षण असतेच. या आकर्षणांची सर्वांगीण परिपूर्ती दिवाळीच्या निमित्ताने होते. दिवाळी म्हणजे प्रकाश आणि स्नेहाचा उत्सव. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात ज्ञान आणि समृद्धीचा प्रकाशदीप उजळत रहावा, गोड-धोड फराळाने तोंड गोड व्हावे. आप्तेष्ट, स्नेही यांच्यात तसेच समाजात स्नेह वृद्धिंगत व्हावा; असा संदेश दिवाळी देते.

शालेय मुलांसाठी दिवाळी सण म्हणजे मौजमजेची जणू पर्वणीच! एक तर शाळेला तीन आठवड्यांची दीर्घ सुट्टी. मग काय, खेळ, मजा, दंगा, मस्ती आणि धमाल! जोडीला नवीन कपडे, स्वादिष्ट खमंग पदार्थ,

मित्र आणि नातेवाईकांच्या भेटी. आमच्या लहानपणी आणि आताच्या मुलांसाठी सर्व गोष्टी याच आहेत. त्यांचे स्वरूप मात्र भिन्न आहे. दृष्टिकोन थोडा बदलला आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासात दिवाळीच्या सुट्टीचा सदुपयोग कृतियुक्त उपक्रमांनी कसा करून घेता येईल, हे पाहिले जात आहे, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. शाळा आणि शिक्षक विविध अभिनव उपक्रम राबवीत आहेत. पालक, विद्यार्थी चांगला प्रतिसाद देत आहेत. एकेकाळी दिवाळीचा अभ्यास केवळ बौद्धिक असायचा. आता तो अनुभवाधारित, कृतिशील होत आहे. शारीरिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा वैयक्तिक व सामूहिक गुणकौशल्यांना वाव देणाऱ्या उपक्रमांचा अंतर्भाव आता विद्यार्थी विकासात होत आहे. अशा उपक्रमांचा अंतर्भाव केवळ आवश्यकच नाही, तर अनिवार्य आहे. नव्या पिढीची नवी दृष्टी विकसित होण्यास हेच मूलभूत साधन ठरणार आहे. प्रत्येक वर्षी दिवाळीच्या सुट्टीचा हा कालावधी मुलांच्या नवसर्जनास पूरक आणि पोषकच ठरावा. यासाठी एखादा पथदर्शी कार्यक्रम सर्वांपुढे मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

जिल्हा परिषद कोल्हापूर अंतर्गत करवीर तालुक्यात शिक्षण विस्तार अधिकारी पदावर मी कार्य करीत आहे. अनेक अभिनव उपक्रमांच्या आयोजनात पुढाकार घेण्यात मला रस आहे. प्रस्तुत 'बाल परिसंवाद' उपक्रम एक प्रतिनिधिक स्वरूप आहे. आम्ही 'बाल परिसंवाद' हा उपक्रम गतवर्षीच्या दिवाळी सुट्टीनंतर राबविला. सुट्टीत विद्यार्थ्यांना दिलेल्या कृती कार्यक्रमाचा हा उत्तम परिपाक ठरला.

कोरोना संकटाच्या छायेत सन २०२० ची दिवाळी येते आहे. अशा काळात तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करून आपण हा उपक्रम राबवावा. या उपक्रमाच्या अनुभवाने आपणास विद्यार्थी विकास नक्की साधता येतो, असा विश्वास आपणामध्ये निर्माण होईल, असे वाटते.

माध्यमिक विद्यालय कळंबा, पाचगाव या शाळेचे मुख्याध्यापक आणि कृतिशील शिक्षक हे दोघे कार्यालयात भेटायला आले. शाळेमध्ये त्यांनी बाल महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवात मी मुलांशी संवाद साधावा, असा त्यांचा मानस होता. मी बाल महोत्सवाचे स्वरूप जाणून घेतले. पहिल्या सत्रात साहित्यिक, व्याख्याते यांचे मार्गदर्शन होते. दुसऱ्या सत्रात माझे व्याख्यान होते. मी थोडा विचार केला आणि कृतिशील शिक्षकांना एक अभिनव कल्पना सांगितली. मी एकट्यानेच मुलांशी बोलण्यापेक्षा, व्याख्यान देण्यापेक्षा आपण थोडा वेगळा प्रयोग करून पाहू, असे मी त्यांना सांगितले. बाल महोत्सव असेल तर मुलांनीच बोलणे अधिक चांगले. मुलांनी वैचारिक आविष्कार सादर केला तर महोत्सवाचा उद्देश यशस्वी होईल. मग असे ठरले की, चार मुले एखाद्या विषयावर आपले विचार मांडतील. तो होईल बाल परिसंवाद! या परिसंवादाचा अध्यक्ष मी असेन. परिसंवादाचा विषयही निश्चित झाला. तो मुलांच्या अनुभवविश्वाशी, वर्तमान काळाशी निगडित ठेवला. तो परिसंवादाचा विषय होता. 'सोशल मीडिया शाप की वरदान!' थोडी चुरस येण्यासाठी दोन विद्यार्थी अन्य शाळेतील आणि दोन विद्यार्थी यजमान शाळेतील घेण्याचे निश्चित झाले. करवीर तालुक्यातील अनेक विद्यार्थी वक्ते मी पाहिले आहेत. त्यातील देवाळे हायस्कूलची विद्यार्थिनी प्रभा जाधव आणि हणमंतवाडी हायस्कूलची विद्यार्थिनी समृद्धी जगदाळे या दोन विद्यार्थिनींची मी शिफारस केली. मुख्याध्यापकांनी स्वत:च्या शाळेतील दोन मुले चाचणी घेऊन निवडावीत, असे ठरले.

नियोजनानुसार या मुलांना मान्यवर पाहुण्यांचा दर्जा दिला गेला. निमंत्रण पत्रिकेत त्यांची नावे छापण्यात आली. परिसंवादात समृद्धी, प्रभा, अनुज आणि प्राची प्रमुख वक्ते झाले. त्यांना शाळेत जाऊन निमंत्रण पत्रिका देण्यात आली.

बालपरिसंवाद दुपारच्या सत्रात संपन्न झाला. सर्वांचे नुकतेच भोजन झाले होते, पण आपल्याच वयाचे चार वक्ते आपल्यासमोर मंचावर पाहून मुलांची उत्सुकता वाढली. चारही बालवक्त्यांना सन्मानाने कोचावर बसविण्यात आले. त्यांच्या छातीवर 'सन्मान बिल्ला' लावण्यात आला. जणूकाही आपण कोणी विशिष्ट व्यक्ती आहोत, अशी भावना या वक्त्यांची झाली. हे वक्ते आठवी ते दहावी या वर्गातील होते.

प्रत्यक्ष परिसंवादाची सुरुवात या बाल वक्त्यांच्या ओळखीने झाली. परिसंवाद रंगत गेला आणि या परिसंवादाचा अध्यक्ष असलेला मी सूत्रधाराच्या भूमिकेत कधी गेलो कळलेच नाही. चारही मुलांनी अत्यंत प्रभावी–पणे आपली मते व्यक्त केली. एक सव्वा तास कसा भुर्रकन गेला कळलेही नाही. विशेषतः प्रभा जाधव हिचे विचार सर्वांवर प्रभाव पाडून गेले. खरे तर समाजामध्ये सर्वच स्तरांतील माणसे सोशल मीडिया विरुद्ध ओरड करीत असताना दिसतात. अशा परिस्थितीत या चारही बाल वक्त्यांनी सोशल मीडिया हे नव्या पिढीसाठी वरदान आहे. असे स्पष्ट केले. कोविड–१९ संकटात 'शाळा बंद, शिक्षण सुरू' अभियानासाठी ऑनलाईन तंत्रज्ञान प्रबळ आधार ठरणार आहे, हे त्यांनी आधीच ओळखले असावे. त्यासाठी या मुलांनी दैनंदिन जीवनातील उदाहरणे दिली. एखाद्या शब्दाचा अर्थ शोधण्यासाठी आता कपाट उघडून शब्दकोश हाती घ्यावा लागत नाही. हातातील मोबाईलवर गुगलवरून आपल्याला अर्थ आणि माहिती त्वरित उपलब्ध होते. अशा एक ना अनेक गोष्टी या बाल वक्त्यांनी मुलांसमोर व्यक्त केल्या. सोशल मीडियाचे वाईट परिणाम स्पष्ट करताना या मुलांनी सोशल मीडियाला दोष दिला नाही. दोष असेल तर तो वापरकर्त्याचा (User) आहे असे सर्व मुलांनी ठामपणे सांगितले. माकडाच्या हातात आगपेटी दिली तर तो वणवाच लावणार, असा दाखला एका विद्यार्थ्यांने दिला. एकंदरीत नवी आणि भावी पिढी सोशल मीडियाकडे अत्यंत सकारात्मकतेने पाहते, असेच या परिसंवादातून दिसून आले.

प्रत्येक शाळेत या विषयावर सकारात्मक परिसंवाद झाले, तर विद्यार्थी सोशल मीडियाचा विधायक आणि ज्ञान संपादनासाठी निश्चितच उपयोग करतील, असे वाटते. अशा प्रकारच्या परिसंवादाचा हा प्रयोग खूपच यशस्वी झाला. या प्रयोगामुळे मुले बोलू लागली. स्वतंत्र विचार करू लागली. नवविचाराने नवी दृष्टी शोधू लागली. हे पाहून आमच्यासारखे प्रौढ अचंबित झाले. नवा विचार करणाऱ्या अशा मुलांना सलामच करावासा वाटतो. शिक्षणक्षेत्रात होत असलेल्या अशा नव्या प्रयोगांचे आणि त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या शिक्षकांचे विद्यार्थी, पालक, प्रशासन आणि शासन यांनी स्वागत करायला हवे. या वर्षीच्या दिवाळीच्या निमित्ताने हा संकल्प आपण जरूर करू या. तो अंमलात आणू या. आशेचे किरण खूप आहेत. कारवाँ बनता जायेगा।

■■■

---

**(पृष्ठ क्र. ३१ वरून)**

लाल दिसायला लागला तरी वाट न पाहता गरम तुपातून बाहेर काढावा लागतो, नाहीतर तो लगेचच करपतो. अनारसा तळण्याचे हे काम फारच नाजुकपणे करावे लागते, पण चांगला खुसखुशीत अनारसा असा काही तोंडात विरघळतो, म्हणता...

ए आजी, आणखी एक अनारसा दे ना...

'काय रे तुझी लुडबुड सारखी स्वयंपाक घरात? चालता हो पाहू बाहेर फटाके उडवायला'... आई.

'धर..., हा घे...नुसती भुणभुण... घे...आणि हो बाहेर...हावरट कुठला...' ...आजी.

'हाऽ हाऽ हा...'

■■■

# नको फटाक्यांची वात...

**भाऊसाहेब चासकर**
जि. प. शाळा वीरगाव, अकोले, जि. अहमदनगर
भ्रमणध्वनी : ९४२२८५५१५१

*नको फटाक्यांची वात, लावू विवेकाची ज्योत!*

ही गोष्ट आहे साधारण पाच वर्षांपूर्वीची. 'फटाके–मुक्त दिवाळी' साजरी करायची विषयावर परिपाठात आमची चर्चा सुरू होती. तसे या विषयावर आमच्या शिक्षकांचे सतत बोलणे सुरू होते. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून शाळेतील बहुसंख्य मुले फटाके वाजवत नाहीत. जी मुले फटाके वाजवतात त्यांचेही प्रमाण कमी कमी होत गेले आहे. बहिरवाडी, ता. अकोले, जि. अहमदनगर या आमच्या शाळेतील मुलांनी फटाके वाजवायचे नाहीत, हा आमच्या उपक्रमाचा पहिला टप्पा होता. त्यात यश आल्यानंतर आता शेजारच्या तीन–चार गावांतील मुलांना, त्यांच्या घरातील मोठ्या माणसांना भेटून, त्यांनाही फटाके वाजविण्यापासून परावृत्त करायचे असे ठरले. त्यांचे मन वळवायला काय करायचे, याविषयी चर्चा केली. मुलांकडून अनेक मुद्दे आले. अखेर माहितीचे पत्रक (पँम्प्लेट) छापून घ्यायचे आणि ते गावागावात, घरोघरी, शाळाशाळांत वाटायचे ठरले.

> *सध्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर आणि कोरोनाच्या संकटात फटाक्याच्या प्रश्नाने जोर धरला आहे. फटाके उडविण्याबाबत उलटसुलट मते व्यक्त होत आहेत, मात्र बहिरगावच्या शाळेतील मुलांना फटाके उडविण्यातील धोक्यांविषयी केव्हाच जाण आली होती. या शाळकरी मुलांनी स्वतः फटाके उडविणे सोडलेच शिवाय परिसरात अनेकांचे प्रबोधन केले. त्यांच्या या उपक्रमाविषयी...*

पत्रकात काय लिहायचे, हेही मुलांनीच ठरवायचे होते. त्यामुळे मुलांना पत्रक आपलेसे वाटेल अशी त्यामागील भूमिका होती. बऱ्याच मुलांना पर्यावरणाचा मुद्दा महत्त्वाचा वाटत होता. फटाक्यांतून बाहेर पडणारे वायू अत्यंत विषारी असतात. ते वातावरणात मिसळतात. माती, हवा आणि ध्वनीचे प्रदूषण वाढते. फटाक्यांना कागद लागतात, त्यासाठी झाडे तोडली जातात. पर्यावरणाचे संतुलन बिघडते. फटाके वाजवितानाही गंभीर अपघात/दुखापती होतात. कानांचा पडदा फाटून बहिरेपणा येतो. भाजते, जखम होते. कायमचे अंधत्व येऊ शकते. प्रसंगी जन्मभराचे अपंगत्व वाट्याला येते. काही जण मृत्युमुखी पडतात. दुर्दैवाने यात लहान मुलांची संख्या मोठी असते. फटाक्यांमुळे अनेकांना ॲलर्जी, जळजळ, दमा, निद्रानाश असे आजार होऊ शकतात. वगैरे वगैरे... गोल रिंगण करून बसलेल्या मुलांमध्ये अशी छान चर्चा सुरू होती. हे शांतपणे ऐकताना मुले या विषयाकडे किती गंभीरपणे आणि व्यापक दृष्टीने पाहत आहेत, हेही शिक्षक म्हणून माझ्या लक्षात येत होते. आपण जे बी पेरले आहे त्याला विचारांचे अंकुर फुटत आहेत, हेच या चर्चेतून समोर आले. ते बघून छान वाटत होते.

फटाके तयार करायच्या कारखान्यांत प्रामुख्याने लहान मुले काम करतात. घातक स्फोटकं हाताळतात.

तिकडे अनेकदा आगी लागतात. मोठाले स्फोट होतात. किती तरी कोवळ्या जीवांची अक्षरशः होरपळ होते. हसण्या-खेळण्याच्या वयातच गरीब बिचारी मुले जिवानिशी जातात. गंभीर दुखापतीने कित्येक जण कायमचे जायबंदी होतात. काहींना गंभीर आजारांशी सामना करावा लागतो. आनंद साजरा करायला आपण जे फटाके वाजवितो ते आपल्याच वयाच्या मुलांच्या 'शोषणा'तून तयार झालेले असतात, याची जाणीव मुलांना करून दिली.

हे मुद्दे एकत्र करून पत्रक छापायचे ठरले परंतु ते छापण्यासाठी पैसे कोठून आणायचे? येथे गाडी अडली. तुम्ही करीत आहात ते काम चांगले आहे. गावच्या सरपंचांना भेटून सांगून पाहा. कदाचित ग्रामपंचायतीकडून ते पैसे देतील, असे मुलांना सुचविले. 'सर, तुम्ही सरपंचांना फोन लावा. आम्ही जाऊन भेटून त्यांना विनंती करू' असे मुले म्हणाली. मी मुलांना फोन लावून दिला. फोनवर बोलणे झाल्यानुसार दुसऱ्या दिवशी सकाळीच दोन मुलांनी सरपंचांना गाठले. वसुली झालेली नसल्याने ग्रामपंचायतीकडे पैसेच नव्हते. सरपंचांनी मुलांना 'बजेट' विचारले. स्वतःच्या खिशातून पैसे द्यायचे कबूल केले. मुले आनंदाने उड्या मारीत शाळेत आली. अगदी साध्या कागदावर दोन हजार पत्रके छापून घेतली. परिसरातील गावांमध्ये घरोघरी फिरून मुलांनी पत्रके वाटली. शेजारच्या गावातील प्राथमिक शाळा-विद्यालयात जायचे. मुख्याध्यापकांची परवानगी घ्यायची. शाळेतील मुलांच्या हातात पत्रकं द्यायची. शक्य होईल तशी आपली भूमिका पटवून सांगायची असे ठरविले. एका माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांना भेटायला गेलेला मुलींच्या गटाने कार्यालयात गेल्यावर मोठ्या धिटाईने येण्यामागचे प्रयोजन सांगून पत्रके दिली. चांगला अनुभव आल्याने त्यांचा आत्मविश्वास दुणावला. या प्रचार मोहिमेदरम्यान काही मोठ्या माणसांनी मुलांना मुद्दाम खोचक प्रश्न विचारले. मुलांनी त्यांना शांतपणे उत्तरे दिली, उद्देश सांगितला. पर्यावरणाच्या रक्षणासाठी केवळ फटाकेमुक्त दिवाळी साजरी करायची आहे. इतकेच नाही, तर शाळेतील मुलांनी मिळून हजारहून जास्त झाडे लावली, जगविली आणि वाढविली आहेत, गटातील प्रत्येक मुलाने झाड दत्तक घेतले आहे, मुले वहीचा कागद कसा जपून वापरतात. असे अनेक मुद्दे मुलांजवळ होते सांगण्यासारखे! वरवर बघता या कृती किंवा उपक्रम लहान असला तरी लहान वयात चांगले संस्कार मुलांमध्ये रुजल्याचे ते उदाहरण होते.

उंच खडक गावात एका आजीबाईंनी मुलांना भूक लागली असेल असे म्हणत जेवण करून जायचा आग्रह केला. चहाच्या लहानशा हॉटेलमध्ये पत्रके द्यायला गेलेल्या मुलांची तेथील मोठ्या माणसांनी 'कोणत्या शाळेतून आला आहात? कशाला आला आहात?' अशी आस्थेने विचारपूस केली. 'पोरांनो, तुम्ही चांगले काम करीत आहात', असे म्हणत कौतुक केले. शाबासकी मिळालीच शिवाय चहा-बिस्किटे, खाऊ मिळाला. मुलांमध्ये आणखी उत्साह संचारला. किरकोळ फटाके विक्रेत्यांनाही मुलांनी मुद्दाम पत्रके दिली! 'फटाक्यांशिवाय दिवाळी कशी साजरी करायची?' असा टोकदार प्रश्न काहींनी विचारला. ''अहो काका, फटाके वाजवलेच पाहिजेत, असा कायदा आहे का?,'' असा प्रतिप्रश्न मुलांनी केला. मुलांचे चार गट पत्रके वाटत होती. या 'फटाकेमुक्त दिवाळी' मोहिमेचा प्रचार करीत होते. एका गटातील मुलांनी जीप ड्रायव्हरला पत्रक दिले. त्या ड्रायव्हरने पत्रकाचा चोळामोळा केला आणि जीपची काच पुसायला ते पत्रक वापरले. मुले हिरमुसली. त्यांना वाईट वाटले. एका घरात काही तरुण दारू पीत होते. पत्रके द्यायला गेलेल्या मुलांना त्या नशेबाजांनी थेट पिटाळून लावले. मुलांना अपमान झाल्यासारखे वाटले. आयुष्यात असे प्रसंग येतातच. त्याला संयमाने आणि धीराने सामोरे जायचे असते, हे या प्रसंगातून मुले शिकली असणार. रस्त्यात भेटलेल्या एका व्यक्तीने पत्रक वाचले. मुलांचे खूप कौतुक केले. 'मी माझ्या घरच्या मुलांसाठी

फटाके घेणार नाही' असे आश्वासन त्यांनी मुलांना दिले. वेगवेगळ्या ठिकाणी पत्रके वाटून आलेली मुले शाळेत आपापले अनुभव शेअर करीत. अनुभवकथन करताना मुलांना मजा येत होती.

'फटाकेमुक्त दिवाळी' साठी दोन-तीन वर्षे जोरदार प्रचार मोहीम उघडली होती. शाळेच्या वेळेव्यतिरिक्तचा वेळ मुलांनी यासाठी दिला. पाच गावांच्या परिसरातील लोकांच्या एकमेकांशी ओळखीपाळखी होत्याच. मुलांच्या या प्रचाराविषयी परिसरात चांगलीच चर्चा सुरू झाली. मुलांचे कौतुक पालकांनाही ऐकायला मिळू लागले. इतर मुलांना या 'गुणी' मुलांचे 'दाखले' दिले जाऊ लागले. घरात देखील मुलांची भूमिका स्वीकारली गेली. मुलांना याचा मोठा आनंद होता. मुले भलतीच खुश होती. यातून मुद्दा पोहोचत गेला. अभियानाचे प्रचारक असलेल्या मुलांच्या गटाने शाळेतील इतर मुलांकडून 'फटाकेमुक्त दिवाळी' साजरी करणार असल्याचे संकल्प पत्रच लिहून घेतले. 'फटाकेमुक्त दिवाळी' साजरी करणार असल्याची शपथ लिहून ती मुलांकडून म्हणून घेतली. मोहिमेदरम्यान मुलांचे नेतृत्व अमेझिंग होते. दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी मातीचे किल्ले तयार करा. गड-किल्ल्यांना, पर्यावरणस्नेही, प्रसिद्ध ठिकाणांना भेटी द्या, आकाशकंदील बनवा. शुभेच्छापत्र तयार करा, पणत्यांची आरास करा, अंगणात पानाफुलांच्या रांगोळ्या घाला, दिवाळीतील पारंपरिक लोकगीतांचे संकलन करा. घराची साफसफाई करायला आणि फराळ बनवायला आईला मदत करा. वाचविलेल्या पैशांतून शैक्षणिक संस्थांना आर्थिक मदत करा. नवे कपडे, खेळणी घ्या. पुस्तके विकत घ्या, ग्रंथालयांना पुस्तके भेट द्या. आप्तेष्ट, नातेवाईकांच्या गाठीभेटी घ्या, वयोवृद्धांशी गप्पागोष्टी करा. परिसरातील एखाद्या घरी फराळ देऊन आनंद वाटून घ्या. अशा गोष्टी करण्याचे आवाहन पत्रकातून केले होते.

दिवाळी झाली. बहिरवाडी आणि परिसरातील गावात फटाके वाजविण्याचे प्रमाण लक्षणीय कमी झाल्याचे मुलांनीच काय पालकांनीही शाळेत येऊन शिक्षकांना सांगितले. संकल्प नावाच्या मुलाने बँकेत जाऊन खाते उघडले. फटाक्याचे वाचलेले ८०० रुपये खात्यावर भरले. दरवर्षीप्रमाणे काही मुलांच्या नातेवाईकांनी फटाके आणले होते, पण मनातून फटाकेमुक्त दिवाळीची वात पेटली होती. मोहाला बळी पडण्याचा प्रश्नच नव्हता. त्या फटाक्यांच्या वाती पेटल्याच नाहीत. या प्रचार मोहिमेमुळे गावाची किमान दीड-दोन लाख रुपयांची बचत झाली असल्याचे मुले आणि पालकांनी सांगितले. पैसे किती वाचले, ही गोष्ट फार मोठी नाही. चिमुकल्या हातांनी फटाक्यांऐवजी 'पणतीच्या वातीच्या रुपाने विवेकाची ज्योत' पेटविली होती. जबाबदार नागरिक होण्यासाठी पर्यावरणाविषयी आवश्यक संवेदनशीलता मुलांमध्ये आली, हे जास्त महत्त्वाचे आहे.

'जीवन शिक्षण' साठी हा लेख लिहीत असताना काही मुलांना फोन करून 'फीड बॅक' घेतला. सर, मी तेव्हापासून फटाके वाजवायचे बंद केले आहेत. वडील सुरसुऱ्या, टिकल्या आणतात फक्त. शाळेत असल्यापासूनच फटाके वाजवायची सवय मोडली. 'आमच्या मित्रांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये आम्ही फटाक्यांना विरोध करतो,' बारावी उत्तीर्ण झालेला संकल्प बंगाळ सांगत होता. शाळेने विविध उपक्रमांतून दिलेले संस्कार मुलांच्या जगण्याचा स्थायिभाव होत आहे, हे बघून आनंद व अभिमान वाटतो.

सध्याच्या काळात संवाद हरवत चालला आहे. या मोहिमेत मुलांना संवाद कौशल्याचे महत्त्व कळले. हेटाळणी, अपमान यांकडे दुर्लक्ष करून पुढे जायचे अनुभवजन्य प्रशिक्षण मिळाले. समाजातील सध्याचे प्रश्न समजून घेऊन त्या प्रश्नांना थेटपणे भिडण्याची समज मुलांमध्ये या वयात रुजते आहे, विकसित होत आहे हे या कृतीतून दिसत आहे. जीवन जगण्यासाठी अशी समज, शहाणपण येणे महत्त्वाचे आहे.

या उपक्रमातून हे साध्य होत असल्याचा आनंद मोठा आहे.

■■■

# मा. सचिवांची बालकट्ट्याला शाबासकी

**प्रवीण काळमपाटील**
शिक्षण विस्तार अधिकारी,
बीट – गेवराई, जि. बीड
भ्रमणध्वनी : ७०३८०४५१७२

टाळेबंदीमधील ऑनलाईन बालकट्ट्याला मा. सचिवांचे मार्गदर्शन.

'The children are wonderfully confident' I am glad, they are using the lockdown time well.

ही शाबासकी आहे. दस्तूरखुद्द मा. वन्दना कृष्णा (अपर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन) यांची आणि ती मिळाली आहे बीट गेवराई क्रमांक दोन, तालुका गेवराई, जिल्हा बीड येथील विद्यार्थ्यांना. निमित्त होते टाळेबंदीतील कालावधीत विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे जाऊन शिकलेल्या नवीन भाषा, कौशल्ये, तंत्रे, कला यांच्या सादरीकरणासाठीचा विद्यार्थ्यांचा बीट स्तरीय ऑनलाईन बालकट्टा! अशी शाबासकी म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, स्वयंसेवक व आम्हा सर्वांना मिळालेले खास पारितोषिकच होय. कदाचित राज्यातील हा असा पहिलाच बालकट्टा असावा. अशा अनोख्या बालकट्ट्याचे वर्णन करण्यापूर्वी मी काही पार्श्वभूमी मांडणार आहे.

> *कोरोनाच्या काळात अनेक नवनव्या कल्पना लढवून मुलांचे शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न झाला. पाठ्यपुस्तकाच्या पलीकडचे हे शिक्षण होते. नवीन भाषा, कौशल्ये, कला विद्यार्थी शिकले आणि त्याचे सादरीकरण केले. ऑनलाईन बालकट्ट्यावर राज्याच्या अपर सचिवांनी गौरविलेल्या या बालकट्ट्याविषयी...*

*मुश्कीलोंसे भाग जाना आसान होता है,*
*हर पल जिंदगी का इम्तेहान होता है ।*
*डरनेवाले को कुछ नही मिलता जिंदगी में,*
*लड़नेवाले के कदमों मे जहाँ होता हैं।*

वरील ओळी आवर्जून आठवत आहेत कारण कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे सर्व जग, पालक अस्वस्थ झाले असताना या संकट काळात आपल्या विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू ठेवून आपण व आपल्या शिक्षकांनी पालकांना स्वस्थ केले आहे. सगळीकडे टाळेबंदी झाली आणि शाळाही बंद कराव्या लागल्या. परंतु केवळ आठच दिवसांत आम्ही संपूर्ण बीड जिल्ह्यात 'वर्क फ्रॉम होम' च्या धर्तीवर 'स्कूल फ्रॉम होम' सुरू करू शकलो. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी अजितजी कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तत्कालीन शिक्षणाधिकारी अजय बहीर यांच्या पुढाकाराने लॉकडाऊन कालावधीत राज्यातील मुलांच्या अभ्यासासाठीचे पहिले 'माझी शाळा' हे मोबाईल ॲप्लिकेशन १४ एप्रिल २०२० ला आम्ही सर्वांसाठी उपलब्ध करून देऊ शकलो आहोत. हे ॲप्लिकेशन शिक्षकांनीच तयार केले आहे हे विशेष! संकटात संधी सापडते ती अशी.

'माझी शाळा' हे मोबाईल ॲप्लिकेशन व्हॉट्स ॲप ग्रुप, जिऑग्राफिकल ग्रुप, ऑनलाईन तासिका, फेसबुक, यू–ट्यूब लाईव्ह, छापील स्वाध्याय पुस्तिका, भोंगा शाळा, स्वयंसेवकाच्या मदतीने प्रत्यक्ष शिकविणे, अशा विविध माध्यमांतून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू असतानाच शासनाची 'शाळा बंद पण शिक्षण सुरू', अधिकारी व्यावसायिक विकास मंच, टिली मिली, विविध ऑनलाईन प्रशिक्षण अशा विविध माध्यमांतून आम्हांला मौलिक मदत मिळत आहे.

आनंददायी रचनात्मक शिक्षण प्रकल्पात सुचविल्याप्रमाणे अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांच्या कला, कौशल्यांना संधी देण्यासाठी आम्ही गेल्या वर्षीच पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे जाऊन काम करण्यास सुरुवात केली आहे. एकविसाव्या शतकातील कौशल्ये, Six-'C' विकसित होण्यासाठी विविध संधी बीटमध्ये उपलब्ध करून देत आहोत. अभ्यासासोबतच बाल साहित्य संमेलन, ऑनलाईन चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, योग शिबिर, बाल सभा, आहार मार्गदर्शन, पाक कला व अन्य स्पर्धा, यूपीएससी मधील यशवंतांचे मार्गदर्शन असे विविध उपक्रम हाती घेतले. या उपक्रमांना विद्यार्थ्यांनी दिलेला प्रचंड प्रतिसाद आमचा उत्साह वाढविणारा आहे.

विद्यार्थ्यांना गतीने व नवनवीन विषय शिकायला आवडेल हे आम्ही शिरूर तालुक्यातील (जिल्हा पुणे) वाबळेवाडी या शाळेला गेल्या वर्षी दिलेल्या अनेक भेटींमधून अनुभवले होते म्हणून दिनांक १७,१८,१९ व २० फेब्रुवारी २०२० या कालावधीत आम्ही अरुण यादव (इंजिनिअर वाबळेवाडी) श्रेयस मिस्त्री (मेकॅनिकल इंजिनिअर, मुंबई), हेमांगी मॅडम (कॉम्प्युटर इंजिनिअर, चंद्रपूर) यांना गेवराई तालुक्यातील गौंडगाव सारख्या अगदी छोट्या खेड्यात बोलावून त्यांचे चार दिवसांचे वर्कशॉप आयोजित केले होते. विशेष म्हणजे या वर्कशॉपमध्ये बीड, जालना, औरंगाबाद या जिल्ह्यातील १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये कोडिंग, ॲनिमेशन, इलेक्ट्रिक सर्कीट, रोबोटिक्स अशा विविध बाबी विद्यार्थी कुतूहलाने व उत्साहाने शिकले.

गतीने शिकून अभ्यासक्रम लवकर पूर्ण करता येतो व नवनवीन बाबी शिकण्यासाठी पुरेसा वेळ व संधी मिळते, याचा अनुभव बीटच्या अनेक विद्यार्थ्यांनी घेतला होता म्हणूनच या टाळेबंदीच्या कालावधीत गौंडगाव, राक्षसभुवन, घोडराई, पांचाळेश्वर, मोरेवस्ती, जाधवनगर अशा विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी विषय मित्रांच्या व उपलब्ध साधनांच्या मदतीने आपला अभ्यास पूर्ण करून इतर कौशल्ये, तंत्र, भाषा, कला शिकायला सुरुवात केली. आमच्या 'मिशन इंटरनॅशनल' व उपयुक्त बीट 'आपली माणसं' या गटावर मी हे सर्व करीत होतो.

कोजागिरी पौर्णिमेच्या निमित्ताने दि. ३० ऑक्टोबर २०२० रोजी या बालकट्ट्याचे सायंकाळी ५ ते ७ या वेळांत आयोजन करण्यात आले होते. 'लॉकडाऊनच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकापलीकडे जाऊन शिकलेले नवनवीन विषय, भाषा, कौशल्ये, कला तंत्रज्ञान यांचे सादरीकरण करण्यासाठीची संधी म्हणजेच हा 'ऑनलाईन बालकट्टा होय.' विद्यार्थ्यांच्या या सादरीकरणाला शुभेच्छा देण्यासाठी बीड जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी मा. श्रीकांत कुलकर्णी उपस्थित होते, तर विद्यार्थ्यांना शाबासकीची थाप देण्यासाठी व पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यासाठी राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा मंत्रालयाच्या अपर सचिव दस्तूरखुद्द मा. वन्दना कृष्णा या सहभागी झाल्या होत्या. शिक्षण सल्लागार श्री. सिद्धेश वाडकर यांच्यामुळे हा योग जमून आला होता. सुट्टीचा दिवस असूनही त्यांनी

तब्बल एक तास वेळ दिला, इंग्रजी शब्दांचे उच्चार कसे करावेत? नवीन शब्दांचे अर्थ कोठे शोधले? मराठी भाषा का शिकली? कशी शिकली? यासाठी कोणते ॲप वापरत आहात? हे संवाद तुम्ही स्वतः तयार केले आहेत काय? मोबाईलचे ॲप्लिकेशन कसे तयार केले? ते कोठून शिकलात? असे अनेक प्रश्न मा. सचिव महोदयांनी विचारून विद्यार्थ्यांकडून सर्व बाबी बारकाईने समजून घेतल्या. विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी, भाषांमधून या प्रश्नांची उत्तरे दिली. तब्बल २६ विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले. सई, वैष्णवी व प्रियंका यांनी या बालकट्ट्याचे संचलन केले. विशेषतः सई या विद्यार्थिनीने केलेले इंग्रजीमधील संचलन सर्वांना भावले. स्वतः मा. सचिव मॅडम यांनी 'सई किती गोड व छान बोलत आहेस, तुझा फोटो मला पाठव', या शब्दांत तिचे कौतुक केले.

जपानी भाषेमधून संवाद, इंग्रजी भाषेमधून संवाद, हिंदीमधील स्वगत, एकपात्री अभिनय, विद्यार्थ्यांनी स्वत: बनविलेल्या मोबाईल ॲपचे सादरीकरण, इलेक्ट्रिक सर्किट बनविण्याचे सादरीकरण, पोवाडा व गीत गायन, इंग्रजी वाक्यांची रचना अशा विविध बाबींचे लक्षवेधक सादरीकरण करून वाहवा मिळवीत होते. विद्यार्थी शेतात जाऊन पालकांकडून मोबाईल घेऊन आले होते. काही पालकही हे सादरीकरण पाहत होते.

एप्रिल २०२० मध्ये आम्ही बीड, पुणे, चंद्रपूर, औरंगाबाद, जालना या जिल्ह्यामधील विद्यार्थ्यांचे ऑनलाईन सादरीकरण आयोजित केले होते. यामुळे त्यांचा आत्मविश्वास उंचावण्यास मदत झाली. तसेच नवीन बाबी शिकण्यासाठी परस्परांकडून मार्गदर्शन, दिशा व प्रेरणा मिळाली. मा. सचिव मॅडम यांनी २०१९-२० मध्ये वाबळेवाडी व इतर शाळांना राज्यातील शिक्षकांनी भेटी देण्याबाबत पत्रक काढले होते. आम्ही गेवराईमधून विविध टप्प्यांत ८०० पालक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, विषयमित्र विद्यार्थी वाबळेवाडी शाळेला भेट देऊन आलो होतो व त्याची मदत आता होत आहे असे विद्यार्थ्यांनी मा. सचिव मॅडम यांना सांगितले. त्यांच्या दूरदृष्टीच्या निर्णयाचाच हा दृश्य, इष्ट परिणाम म्हणजे हा बहुआयामी बालकट्टा! या बालकट्ट्याच्या विशेष मार्गदर्शिका स्वतः मा. वन्दना कृष्णा मॅडम आहेत हा अनोखा योग आम्ही अनुभवू शकलो हे आमचे भाग्य!

ग्रामीण भागातील या छोट्या विद्यार्थ्यांना एवढ्या लहान वयात राज्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांसोबत मनमोकळा संवाद साधण्याची संधी मा. वन्दना मॅडम यांनी दिलीच पण त्यांनी विद्यार्थी व शिक्षकांविषयी काढलेले गौरवोद्गार, दिलेली शाबासकी म्हणजे आमच्यासाठी नोबेल पारितोषिक होय. त्यांचे कौतुक डोळ्यांत साठवत आमचा बालकट्टा पूर्ण झाला.

# दिवाळी

नंदा कुलकर्णी – भ्रमणध्वनी : ९०२८३४२७०४

दिवाळी घेऊन येते
दिव्यांची रांग
अंधाराला म्हणते
लांबच थांब

चांदणीचा आकाश कंदील
तेजाची करतो उधळण
दिवाळी सांगत असते
आनंदात करा सण

फराळाची रेलचेल
येणे जाणे आप्तांचे
दिवाळी सांगत येते
जपा बंध नात्यांचे

तुमची दिवाळी व्हावी म्हणून
किती हात राबतात
दिवाळी सांगते त्यांच्यासाठी
राहू दे तुमचा 'देता' हात

सणांची ही राणी
आनंद वाटते भरभरून
महामारीला पळवून लावा
सांगते आहे मनापासून

देऊ या वचन तिला
प्रकाशाच्या साक्षीने
यंदा दिवाळी घरातल्या घरात
पुढच्या वर्षी धुमधडाक्यात

## ऑक्टोबर २०२० शब्दकोडे - उत्तर

१) छा (वा) कादंबरी

२) ना (च) ग घु मा आत्मचरित्र

३) (न) ट स म्रा ट नाटक

४) (प्रे) मा तु झा रं ग क सा नाटक

५) जा ही (र) ना मा कविता संग्रह

६) ह स (णा) व ळ विनोदी कथा संग्रह

७) (दि) ल खु ला स ललित लेखसंग्रह

८) श्री मा (न) यो गी ऐतिहासिक कादंबरी

(वा) (च) (न) (प्रे) (र) (णा) (दि) (न)

## प्रिय संपादक ....

छत्री पावसाला थांबवू शकत नाही पण पावसात थांबण्याचे धाडस नक्की देऊ शकते. 'जीवन शिक्षण'ने हेच कार्य आजच्या लॉकडाऊनच्या काळात केलेले आहे. आजच्या प्रगत वेगवान आणि स्पर्धेच्या जगात आधीच ताणतणाव खूप आहेत. त्यात कोरोना महामारीची धास्ती, लॉकडाऊनने ठप्प झालेले जीवन, शाळा, कॉलेज बंद असत यामुळे उमेद घेऊन भरारी मारायला सज्ज झालेले विद्यार्थी फार मोठ्या ताणतणावाला सामोरे जात आहेत अशा परिस्थितीत 'जीवन शिक्षण'ने विद्यार्थ्यांचे समुपदेशन करून, विद्यार्थ्यांना यशस्वी होण्याची प्रेरणा दिली.

रचनावादाचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य 'जीवन शिक्षण'ने केले. ऑनलाईन शिक्षण सुरू असताना गुरूशिवाय तरणोपाय नाही असे सांगणाऱ्या लेखात आपल्याला ज्ञानरूपी वसा देणाऱ्या, आईसारखी माया करणाऱ्या, पाठीवर शाबासकीची थाप देणाऱ्या, मार्गदर्शक, दिशादर्शक, समुपदेशक अशा गुरूंचे महत्त्व विशद केले आहे. खरोखरच हा शिक्षकरूपी माऊलीच्या कार्याचा गौरव आहे.

नवे बदल, नवे शिक्षण या लेखातून चिकित्सक व सर्जनात्मक विचार करणे व विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी त्यांना प्रेरित करण्याचे कार्य 'जीवन शिक्षण'ने केले. सोबतच इंग्रजी, भाषा विकासासाठी काय करता येईल, इंग्रजी भाषा विकास कसा साधता येईल याबाबत केलेले मार्गदर्शन खरोखरच खूप मोलाचे आहे. केवळ शिक्षकांचेच अनुभव यात नसून पर्यवेक्षकीय यंत्रणेत कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांचेही मार्गदर्शनपर लेख आहेत. 'इच्छा तिथे मार्ग' हा लेख म्हणजे सर्वच प्रकारचे लाड पुरविल्या जाणाऱ्या, कुठल्याही वेळापत्रकाशिवाय जीवन जगणाऱ्या वातावरणातून आईचे बोट सोडून इयत्ता पहिलीच्या वर्गात येताना धास्तावलेल्या चिमुकल्यांचे हसून प्रेमाने स्वागत करीत त्यांचे मन कसे जिंकून घेता येईल यासाठी केलेले अचूक मार्गदर्शनच होय.

खरोखर अशाच प्रकारे पुढेही आमचे मनोबल वाढावे म्हणून प्रेरणादायी लेखांच्या माध्यमातून आम्हां सर्वांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण करावी या अपेक्षेसह पुढील अंकाकरिता शुभेच्छा!

**कु. कविता घोडे**
गटसाधन केंद्र, हिंगणघाट, डायट, वर्धा.

---

'जीवन शिक्षण' वाचण्यासाठी मी नेहमीच उत्सुक असते कारण प्रत्येक महिन्याला प्रसिद्ध होणाऱ्या या मासिकामधून नक्कीच नवीन काहीतरी शिकायला मिळणारच ही खात्री असतेच. ऑगस्ट २०२० मध्ये प्रसिद्ध झालेला अंक 'ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षण' या विषयावर आहे.

कोरोनाच्या संकटाला सामोरे जात असतानाही राज्याच्या कानाकोपऱ्यांतून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहण्याच्या दृष्टीने अनेक शिक्षक बांधव जे काही उपक्रम, प्रकल्प राबवीत आहेत, त्यांचे चित्रण करणारे विविध लेख या अंकात समाविष्ट आहेत.

या विविध लेखांपैकी सुशीलकुमार पांचाळ यांचा 'कानेगावातील ऑफलाईन शिक्षण' संजय जगताप यांचा 'ऑफलाईन आणि ऑनलाईन शिक्षणाचा सुरेख मेळ, प्रमोद बोरकर यांचा 'शाळेचे प्रयत्न व समाजाची साथ' तसेच अर्चना जिडकुंटावर यांचा 'एक वाटचाल अद्भुत यशाची' हे लेख मला विशेष आवडले व माझ्याप्रमाणेच इतर शिक्षक बांधवांनाही ते प्रेरणादायी ठरतील यात शंका नाही.

असेच नवनवीन उपक्रम, प्रकल्प, योजना यांची माहिती आम्हांला 'जीवन शिक्षण' रूपी मार्गदर्शकातून सतत मिळत राहो!

**राणी सुदाम डावरे**
जि. प. शाळा कर्पेवस्ती, ता. कोरेगाव, जि. सातारा.

# तिमिरातूनी तेजाकडे...



'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. दिनकर पाटील यांनी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगाव बु.।।, सिंहगड रोड, पुणे–४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे – ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

Date of Publication 3 November 2020
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th of November 2020
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2018-2020
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**

# दीपावलीच्या शुभेच्छा !



पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०–२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०–२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

**प्रति** ______________________

______________________

______________________

______________________